बुधवार, १८ जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१४९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 18 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-149 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

चर्चेतली बातमी

## मक्की जागतिक दहशतवादी घोषित


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्राने लष्कर ए तोयबा या दहशतवादी संघटनेचा उपप्रमुख अब्दुल रहमान मक्की याला जागतिक दहशतवादी म्हणून घोषित केले आहे. या निर्णयानंतर अब्दुल मक्कीची संपत्ती जप्त करण्यात येणार असून प्रवासबंदी तसेच शस्त्र बाळगण्यावर बंदी असे निर्बंध त्याच्यावर लादण्यात येणार आहेत. दहशतवादी कारवायांना रोखण्याच्या प्रयत्नात भारताला हे मोठे यश मिळाल्याचे म्हटले जात आहे. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेच्या अल कायदा निर्बंध समितीने अब्दुल मक्की याला जागतिक दहशतवादी म्हणून घोषित केले आहे. मक्की हा लष्कर ए तोयबाचा प्रमुख हाफीज मोहम्मह सईद याचा मोहुणा आहे. ही घोषणा करताना "मक्की तसेच एलईटी, जेयूडी संघटनेतील लोक दहशतवादी कारवायांसाठी निधी उभारणे, संघटनेत तरुणांची भरती करणे, तरुणांना हिंसा करण्यास भडकावणे, भारतात दहशतवादी हल्ले घडवणे अशा कारवायांत सहभागी आहेत," असे निरीक्षण संयुक्त राष्ट्राने नोंदवले. मक्कीला दहशतवादी म्हणून घोषित केले जावे, अशी भारताची पूर्वीपासूनची मागणी आहे. मात्र या मागणीला चीनने याआधी विरोध केलेला आहे.

# ते नेमके कोणते हिंदुत्व सांगत आहेत ?

## राहुल गांधी : संघ आणि मोहन भागवतांवर टीका

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली : मला माहिती नाही की ते नेमके कोणते हिंदुत्व सांगत आहेत. मी कधीही याबाबत ऐकले नाही. मी भगवतगीता, उपनिषदे वाचली आहेत. पण मी कुठेही वाचले नाही की हिंदुंनी आक्रमक असायला हवे, असे म्हणत मंगळवारी हरियाणातील होशियारपूरमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत राहुल गांधींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सरसंघचालक मोहन भागवत यांच्यावर टीका केली. वरुण गांधींविषयी विचारलेल्या प्रश्नावरही राहुल गाधींनी आक्रमकपणे उत्तर दिले.**

वरुण गांधींची भेट घेऊन भारत जोडोप्रमाणे कुटुंबही जोडणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता त्यावर राहुल गांधींनी सडेतोड उत्तर दिले. वरुण गांधी हे भाजपात आहेत. ते जर भारत जोडो यात्रेत सहभागी झाले तर त्यांना अडचणींना सामोरे जावे लागू शकते. माझी आणि वरूण गांधींची विचारधारा वेगळी आहे. मी कधीही संघ मुख्यालयात जाऊ शकत नाही. त्यासाठी माझा गळा चिरावा लागेल. माझ्या कुटुंबाची एक विचारधारा आहे. मी वरूण गांधींना भेटू शकतो, त्यांना आलिंगन देऊ शकतो मात्र त्यांची विचारधारा मी कधीच अंगिकारू शकत नाही, असे राहुल गांधी यावेळी म्हणाले.
दरम्यान, हिंदुंनी आक्रमक असणे हे नैसर्गिक आहे. कारण गेल्या हजारो वर्षांपासून ते युद्ध करत होते, असे मोहन भागवत म्हणाल्याबाबत राहुल गांधींना पत्रकार परिषदेत विचारणा करण्यात आली असता त्यांनी त्यावरून संघावर आणि मोहन भागवतांवर टीका केली. मला माहिती नाही की ते नेमके कोणते हिंदुत्व सांगत आहेत. मी कधीही याबाबत ऐकले नाही. मी भगवतगीता वाचलीये, मी उपनिषदे वाचली आहेत. पण मी कुठेही वाचले नाही की हिंदुंनी आक्रमक असायला हवे. हिंदुत्व हे पूर्णपणे स्वनिरीक्षण, स्वतःला समजून घेणे, नम्रता, करुणा यावर आधारीत आहे. मी हे कुठेही वाचले नाही. कदाचित त्यांनी ही पुस्तके वाचली नसतील, असे राहुल गांधी यावेळी म्हणाले.
भगवान राम यांनाही रावणाबद्दल करुणा वाटली होती. जेव्हा रावण मरणाला टेकला होता, तेव्हा भगवान राम प्रेमभावनेने त्याच्याशी बोलत होते. त्यामुळे मला माहीत नाही की मोहन भागवतांना या कल्पना कुठून मिळत आहेत. या नक्कीच हिंदू संकल्पना नाहीत. त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संकल्पना आहेत, असे ते म्हणाले. हिंदू धर्मात किंवा इतर कोणत्याही धर्मात द्वेष पसरवणे हे कुठेही म्हटलेले नाही. हिंदू धर्म शांतताप्रिय, प्रेमभावना पसरवणारा धर्म आहे. त्यांना जो कुठला रंग हवाय, तो रंग ते घेऊ शकतात. पण जे हिंदू धर्मात लिहिले, ते ते करत नाहीत. ते काहीतरी वेगळे करतात. हिंदू धर्मात असे म्हटलेले नाही की लोकांना घाबरवले पाहिजे, धमकावले पाहिजे, असेही राहुल गांधी यावेळी म्हणाले.

# अनुदानासाठी 'टमरेल' आंदोलनाचा इशारा

## जोरदार घोषणाबाजी करत शौचालयाच्या अनुदानासाठी आंदोलन



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील १७३१ लाभार्थ्यांना शौचालयाचे अनुदान देण्यात आल्याचे मागील १० महिन्यांपूर्वीच दाखवण्यात आले,परंतु प्रत्यक्षात या लाभार्थ्यांना पैसे मिळालेले नाहीत.तात्काळ अनुदानीत रक्कम लाभार्थ्यांना मिळावी याकरिता प्रशांत बंब यांचे स्विय सहाय्यक रवी चव्हाण, सभापती संतोष जाधव, मा. जिल्हा परिषद सदस्य मधुकर वालतुरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दि.१७ जानेवारी गंगापुर पंचायत समिती कार्यालयाचा दालनासमोर जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले नवीनच आलेले गटविकास अधिकारी संजय गायकवाड यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर एक तास चाललेले आंदोलन स्थगित करण्यात आले.
यापूर्वीच धामोरी खुर्द येथील ९० लाभार्थीचे अनुदान पंचायत समिती स्तरवरील एसबीएम फंड मधून अदा करण्यात आलेले होते आता उर्वरित लाभार्थ्यांचे अनुदांनामधील ९० लाख रुपये लगेच वितरित करण्यात येणार असुन राहीलेले अनुदान २६ जानेवारीचा आत देण्यात येणार असून या लेखी आश्वासना नंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.यावेळी मा.नगरसेवक मारोती खैरे, राजु वाबळे, दीपक साळवे, संदीप बोजवारे, कृष्णकांत व्यवहारे,अमोल जाधव, भगवान गाडे, प्रकाश कोकरे, संजय पांडव, कारभारी जाधव, विजय तुपे, आबासाहेब डोणगावकर, अनिल शिंदे, सत्यजित शिरसागर, प्रमोद रोकडे, अनिल कसाने, अंकुश लिंगायत, अफसर शेख, सरपंच संतोष पवार सह इत्यादी लाभार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी प्रभारी पोलिस निरीक्षक साईनाथ गिते यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरिक्षक दीपक औटी, उपनिरिक्षक अजहर शेख, गोपनीय शाखेचे मनोज नवले, अशोक राठोड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# धनुष्यबाणावर शुक्रवारी फैसला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** धनुष्यबाण कुणाचे या प्रश्नाभोवती गेल्या चार महिन्यांपासून शिवसेना आणि शिंदे गटामध्ये वाद शिगेला पोहोचला आहे. याच मुद्यावर आज निवडणूक आयोगामध्ये सुनावणी पार पडली आहे. धनुष्यबाण चिन्ह कुणाला मिळणार याचा फैसला पुन्हा एकदा लांबणीवर पडला आहे. निवडणूक आयोगासमोर पुढील सुनावणी शुक्रवारी होणार आहे. धनुष्यबाण चिन्ह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे की बाळासाहेबांची शिवसेना पक्षाला मिळणार या प्रकरणावर आज निवडणूक आयोगात सुनावणी झाली. यावेळी शिवसेनेकडून कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला आहे. तर शिंदे गटाकडूनही वकिलांची मोठी फौज युक्तिवादासाठी हजर होती. शिंदे गटाने दाखल केली कागदपत्र ही जुनी आहे, महेश जेठमलानी यांनी केलेला दावा हा बोगस आहे. शिवसेनेमध्ये जी फूट पडली आहे त्याचा परिणाम पक्षावर होणार नाही त्यामुळे ही फूट ग्राह्य धरू नये. ही फूट काल्पनिक असू शकते. उद्धव ठाकरे यांची शिवसेनाच ही खरी शिवसेना आहे. जोपर्यंत सुप्रीम कोर्टाचा निर्णय येत नाही, तोपर्यंत निर्णय घेऊ नये, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला होता.
तर, शिंदे गटाकडे पुरेसं संख्याबळ आहे. एखादा गट बाहेर पडला तर त्यात गैर काय आहे. आमदार, खासदारांची जास्त संख्या आमच्याकडे आहे. बहुसंख्येकडे नेणारी आकडेवारी महत्त्वाची आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने निर्णय घ्यावा, असा युक्तिवाद जेठमलानी यांनी केला. दरम्यान, मागील आठवड्यात 10 जानेवारी मंगळवारी यावर दोन्ही बाजूंकडून निवडणूक आयोगात जोरदार युक्तिवाद झाला होता. उद्धव ठाकरे यांचं पक्षप्रमुखपद बेकायदेशीर असल्याचा दावा बाळासाहेबांची शिवसेना पक्षाकडून करण्यात आला होता. तर सुप्रीम कोर्टातील सत्ता संघर्षावर निर्णय घेईपर्यंत कोणताही निर्णय घेऊ नये अशी मागणी ठाकरेंच्या पक्षानं निवडणूक आयोगातील सुनावणीदरम्यान केली होती.
आमदार, खासदारांची आमच्याकडे जास्त संख्या आहे. बहुसंख्येकडे नेणारी आकडेवारी महत्त्वाची आहे. सर्व निकषांवर शिंदे गटच सरस आहे. शिवसेनेची जुनी घटना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे केंद्रीत होती. उद्धव ठाकरेंनी शिवसेनेची घटना बदलली आहे. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनाप्रमुख असे नाव स्वतःसाठी घेतलं मात्र ते शिवसेनाप्रमुख होत नाहीत बाळासाहेबांचे निधन झाल्यावर उद्धव यांनी स्वतःकडे अधिकार घेतले.


# उद्या आम्ही केंद्रात सत्तेत असू

## अरविंद केजरीवाल आणि नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना पुन्हा आमने-सामने

आधुनिक केसरी न्यूज

दिल्ली : मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना पुन्हा आमने-सामने आले आहेत. दिल्लीतील शिक्षकांना फिनलँडला पाठवण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. पण, याला व्ही. के. सक्सेना (एलजी) यांनी परवानगी दिली नाही आहे. यावरून अरविंद केजरीवाल चांगलेच संतप्त झाले आहे. माझ्या शिक्षकांनी कधी माझा अभ्यास तपासला नाही. पण, नायब राज्यपाल सर्व फाईल तपासत आहे. मला लोकांनी निवडून दिलं आहे. दिल्लीतील २ कोटी लोकांनी मला मतदान करुन मुख्यमंत्री केले आहे. मग तुम्ही कोण आहात? असा सवाल केजरीवाल यांनी उपस्थित केला आहे. एलजी सरंजामशाही मानसिकतेने ग्रस्त आहेत. दिल्लीतील गरीब मुलांना चांगलं शिक्षण मिळावं, असं त्यांची इच्छा नाही आहे. एलजी कोण आहे? कुठून आले? आमच्या डोक्यावर येऊन बसले आहे. यांच्यासारख्यांमुळे देश मागे पडत आहे. आयुष्यात कोणतीही गोष्ट कायमस्वरुपी नसते. उद्या आम्ही केंद्रात सत्तेत असू. पण, आमचे सरकार लोकांना त्रास देणार नाही," असेही केजरीवाल यांनी म्हटलं.
एलजी यांना स्वतःहून निर्णय घेण्याचा अधिकार नाही आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, ते पोलीस, जमीन आणि सार्वजनिक सुव्यवस्था वगळता अन्य कोणताही निर्णय घेऊ शकत नाहीत. भाजपा खासदार, आमदार आणि मंत्री आपल्या मुलांना परदेशात शिक्षणासाठी पाठवतात. मग, प्रत्येक गरीब मुलाला सर्वोत्तम शिक्षण मिळायला हवं, यासाठी आम्ही प्रयत्न करत आहे. त्याला तुम्ही रोखणारे कोण?," असा प्रश्न केजरीवाल यांनी एलजींना विचारला आहे.






## उगवतीचे रंग

# तुमची देहबोली सांगते तुमच्याबद्दल






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

पण दुसऱ्याची देहबोली पाहण्याआधी आपण आपल्या देहबोलीचे नीट निरीक्षण केले पाहिजे. आपण बसतो कसे, उभे कसे राहतो, चालतो कसे या सर्व गोष्टींचे काळजीपूर्वक निरीक्षण केले पाहिजे. तर त्यात आपल्याला सुधारणा करता येईल. यासाठी प्रसंगी आरशात पाहून आपण आपल्या देहबोलीचा, बोलण्याचा सराव केला पाहिजे. यासाठी थोडे कष्ट जरूर पडतील. पण प्रत्येक चांगली गोष्ट अंगी बाणवण्यासाठी कष्ट घ्यावेच लागतात. सुरवंटाचे जेव्हा फुलपाखरू होते तेव्हा त्याला सुद्धा दिव्यातून जावेच लागते. आपल्या अनुकूल देहबोलीने एकंदर आपल्या जीवनात फरक पडणार असेल, तर आपण त्यात सुधारणा का करू नये ? दर दहा कोसांवर भाषा बदलते. भाषा जरी तीच असली तरी भाषेचा लहेजा बदलतो. त्याचप्रमाणे देहबोली सुद्धा विविध घटकांप्रमाणे बदलते. हे सुद्धा लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत कोणी भेटले की आपण हात जोडून नमस्कार करतो. पाश्चात्य संस्कृतीत सर्रास हस्तांदोलन केले जाते. काही अगदी पुढारलेल्या देशात व लोकांत हाताचे किंवा गालाचे चुंबन घेतले जाते. आपल्याकडे ही गोष्ट असभ्य मानली जाईल. म्हणून देहबोली सगळीकडे सारखीच असेल असे नाही. पण काही गोष्टी मात्र सगळीकडे सारख्या असतात. आपले चालणे, बसणे, उभे राहणे, चेहऱ्यावरील हावभाव इ. या सोबतच हे ही लक्षात ठेवले पाहिजे की परिस्थिती, व्यक्तीचे लिंग, वय, शरीराची ठेवण, वर्ण, वजन, उंची, बांधा आदी शारीरिक बाबींचा सुद्धा देहबोलीवर प्रभाव पडतो. त्याचबरोबर तुमचा लुक कसा आहे, केसांची ठेवण, दातांची तसेच एकूणच शरीराची स्वच्छता, तुम्ही वापरत असलेला पोशाख आदी बाबी पण तुमचे व्यक्तिमत्व खुलवण्यासाठी मदत करतात. आपल्या व्यक्तिमत्वाला साजेशी हेअरस्टाईल, साजेसा पोशाख यामुळे आपल्या व्यक्तिमत्वाला उठाव येण्यास मदत होते. कधी कधी भडक मेकअप मुळे काही स्त्रियांचे व्यक्तिमत्व खुलून दिसण्याऐवजी वाईट दिसते. **क्रमशः**



## आनंदी पहाट

# बुद्धी, चारित्र्य, कर्तृत्व व गुणांची गरज

आधुनिक केसरी

व्यक्तित्व म्हणजे वेगळं, निराळं अस्तित्व असलेली व्यक्ती. प्रत्येकास जन्मतः स्वतःचं असं व्यक्तित्व असतंच. या व्यक्तित्वावर सामाजिक परिस्थितीचा प्रभाव पडल्यावर व्यक्तित्वाचं व्यक्तिमत्वात रुपांतर होत असतं. एखाद्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्ती जशी आहे तशी, म्हणजे व्यक्तीची शारीरिक ठेवण, बुद्धी, चारित्र्य, कर्तृत्व, गुण आदींचा समावेश त्यात होतो. व्यक्तीचा शारीरिक, भावनिक आणि सामाजिक विकास होत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ह्या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तीचा हा घडलेला पिंड म्हणजे त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व असतं. इंग्रजीत पर्सनेलिटी ही संज्ञा व्यक्तिमत्वास वापरतात. त्यामुळेच व्यक्तिमत्व म्हणजे बाह्य दर्शन असा अर्थ घेतला जात असतो. व्यक्तिमत्वाचा हा अर्थ एकांगी असल्याचं म्हंटलं तर निश्चितच वावगं ठरणार नाही. ह्यामध्ये व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्ट्यांचा, बुद्धीचा, भावनांचा, गुणांचा आणि वृत्तीचा अंतर्भाव होत नसल्याचं स्पष्ट होतं. त्यामुळे ही व्याख्या परिपूर्ण होऊ शकत नाही. व्यक्तिमत्वात व्यक्तीची शरीरयष्टी, चेहरेपट्टी, ठेवण, बांधा, त्याची बुध्दिकौशल्ये, क्षमता, अभिरुची, आवडनिवड, संपादित गुण इत्यादी बाबींचा प्राधान्यक्रमानुसार साकल्यानं विचार केला पाहिजे. ह्या सर्वांची व्यक्तीच्या जैविक देणगीपासून व्यक्तिजीवन जगण्यापर्यन्त झालेली वाटचाल म्हणजे व्यक्तिमत्व, असं म्हणल्यास ते व्यक्तिमत्वाच्या व्याख्येच्या दृष्टीकोनातून योग्य ठरू शकतं. प्रत्येक व्यक्ती जन्मतः वेगळी, विशेष असते. व्यक्तिमत्व विकासामुळे आळस, अनुत्साह आणि निरसतेमध्ये अडकलेली व्यक्ती कार्यक्षम, उत्साही, प्रसन्न आणि आपल्या ध्येयानं प्रेरित होऊ लागते. व्यक्तिमत्व विकासाच्या प्रक्रियेमध्ये व्यक्ती आपल्या वैशिष्ट्यांना कोणत्याही प्रतिकाराशिवाय, आपल्या सीमांच्या बंधनांचा त्याग करणे शिकत असते. आनंदी राहणे शिकत असताना सर्व काही अधिक उत्साहानं, चैतन्यानं करू लागत असल्याचं दिसून येतं.



आधुनिक केसरी

**तेचि परब्रम्ह | विटेवरी ||**
स्थिर वृत्ती ज्याची | राहे निरंतर ||
तोचि युगंधर | ओळखावा ||१||
ज्याच्या मनी गुंजे | सत्कर्माची विणा ||
तोचि एक जाणा | राजयोगी ||२||
प्रज्ञा शील दया | ज्याच्या ठायी वसे ||
तोचि पुत्र असे | गौतमाचा ||३||
हरि चिंतनात | रमे ज्याचे मन ||
तोचि संत मान | ज्ञाना-तुका ||४||
भक्तांसाठी उभा | पंढरीत ठाम ||
तेचि परब्रम्ह | विटेवरी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जीवन सुंदर आहे, व्यापक आहे, अपरिपूर्ण आहे. त्याच्या अपरिपूर्णतेचा स्वीकार ही परिपक्वता आहे. या परिपक्वतेविना भौतिक जीवनाचा आनंद घेता येत नाही.**

**केवळ अप्राप्त वस्तूंचा विचार करू नकोस तसेच केवळ प्राप्त वस्तूंचा विचार करू नकोस. प्राप्ताच्या साहाय्याने अप्राप्त ते प्राप्त कर.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**मेहंदी के पत्ते छिपी, हरे पत्ते में लाल ।**
**युक्ति हाथ पर ऊतरे, त्यों हरि प्रकट कृपाल ।।५२।। (स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/५२**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
मेंदीच्या हिरव्या पानांमधे लाली लपलेली असते, पण रागडल्यावर लालिमा हातावर उतरते. तद्वतच सर्वत्र व्यापक प्रभूला योग-युक्तीने प्रत्यक्ष अनुभव करून ज्ञान, आनंद आणि शांतीची प्राप्ती होते. परमप्रभू योग साधनेद्वारे आत्म्याला प्रत्यक्ष होतात आणि योगी याचा प्रकट अनुभव करून परमानंदात निमग्न होऊन जातो.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

समर्थानी आपल्या अमोघ वाणीने आपल्याला मुक्तिविषयावर सांगितले आहे. समर्थ म्हणतात की कोणी मुक्त असतात तर कोणी नित्यमुक्त असतात. कोणी जीवमुक्त असतात तर कोणी योगी समाधानी विदेहमुक्त असतात. सांख्य म्हणती निर्गुण निर्धारी,प्रगटे पद्मावती निजधर्माचारी।। धर्माला धरून तुम्ही आचरण करा माता भगवती तुमचे रक्षण करील . सांख्य शास्त्रामध्ये विदेहमुक्त व जीवनमुक्त असा भेद आढळतो. ज्ञानाने अविद्या नाश पावते,विवेकबुद्धी उत्पन्न होते पुरूष स्वस्वरूपाला जाणतो. आपणं केलेली प्रारब्ध कर्मे शिल्लक उरल्याने त्याचे शरिर पडत नाही. जोपर्यंत प्रारब्धकर्मे असतात तोपर्यंत जीवनमुक्तिच्या अवस्थेत पुरूष रहातो. त्याला कोणतेही बंधन उरत नाही प्रारब्धकर्मे संपली भोग पूर्ण झाला की देह पडतो. तो विदेहमुक्ति प्राप्त करतो. योगामध्ये असंप्रज्ञात समाधीचे वर्णन करताना विदेह अवस्थेचेही वर्णन पहायला मिळते. यामध्ये सर्व क्रियांचा समावेश असतो. अद्वैतात वेदांच्या अभ्यासामध्ये जीवनमुक्ति मानली आहे. ब्रम्हज्ञान प्राप्त झाल्यानंतर संचित व क्रियमाण भस्म होतात. प्रारब्धकर्मे तेवढी शिल्लक रहातात.ते संपल्याशिवाय हा देह सोडता येत नाही. यालाच जीवनमुक्ति म्हणतात.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# || नामाकरताच नाम घ्यावे ||

आधुनिक केसरी

नाम हे निसरड्यासारखे आहे. निसरड्यावर गवत वाढत नाही, आणि त्याच्यावर पाय पडला तर घसरतो, त्याप्रमाणे नाम आपल्यावर उपाधी ठरू देत नाही. त्याला कोणत्याही उपकरणाची गरज लागत नाही. रोगी-निरोगी, विद्वान्-अडाणी, श्रीमंत-गरीब, लहान-थोर, स्त्री-पुरुष, जात-गोत, यांपैकी कोणतीही गोष्ट असली तरी अडत नाही, नसली तरीही अडत नाही. नामाशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाला शक्ती, बळ, पैसा वगैरे कोणत्या तरी गोष्टीची मदत लागते. असे हे अत्यंत उपाधिरहित असलेले नाम आपणही अत्यंत उपाधिरहित होऊन घेतले तरच त्यात आपल्याला प्रेम येईल. आपण उपाधिरहित होणे म्हणजे नाम हे केवळ नामाकरिताच, स्वतःच्या कल्याणाकरिताच घेणे, जगातल्या दुसऱ्या कशाहीकरिता न घेणे. आपण जर ते सकाम बुद्धीने घेतले, तर इच्छित कार्यभागही साध्य होत नाही, आणि आपले कल्याणही साधत नाही. सकाम नाम घेणे हे किती वाईट आहे हे सांगणे फार कठीण आहे. असे पहा की, स्त्री ही अत्यंत पवित्र आहे, कारण देव, संत यांसारख्या विभूतीही तिच्यापोटी जन्म घेतात; अशा स्त्रियांना पळवून नेऊन अनीतीने वागायला भाग पाडून त्यावर पैसे मिळविण्याचा धंदा काही लोक करतात, ही किती निंद्य गोष्ट आहे बरे ! पण सकाम नाम घेणे ही गोष्ट त्याच्याहीपेक्षा कितीतरी पटीने अधिक निंद्य आहे. म्हणून नाम हे नामाकरिताच घ्यावे, त्याचा संबंध आपल्या



इच्छा-अपेक्षांशी ठेवू नये. नामाकरिता नाम घेतल्याने मन आपोआप अंतर्मुख होऊन जाते. नामाच्या साहाय्याने मन अंतर्मुख केल्यावर आनंद सापडतो. आपल्या हृदयातच तो सापडतो. आपण तीन गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. आचरण अगदी शुद्ध ठेवावे; दुसरी, नामाला कधीही सोडू नये; आणि तिसरी, माझा सांभाळ करणारा कुणीतरी - म्हणजे सद्गुरु - आहे ही जाणीव जागृत ठेवावी. प्रत्येक माणसाला कशाचीतरी विशेष आवड असते; त्या आवडीमध्ये राहावे आणि त्यात जबरीने नाम घ्यावे. आत्मज्ञान व्हावे म्हणून त्याच्या मागे लागले तर ते लवकर होत नाही, भगवंताकडे लक्ष लागले म्हणजे ते आपोआप होते. भगवंताचे नाम घेणे हे ज्ञान होण्याचेच लक्षण आहे. उत्तम वस्तू नेहमी थोडीच असते.

श्रीखंडामध्ये चक्का आणि साखर कितीतरी असते, पण केशर किती थोडे घालावे लागते ! तसे भगवंताच्या नामाचे आहे. रोज थोडे पण अगदी मनापासून आणि मोबदल्याची अपेक्षा न करता नाम घ्यावे, ते फार काम करील. भगवंत हा सर्वसत्ताधीश खरा, पण एका बाबतीत तो लुळापांगळा होतो व सहज अडकतो. भुंगा जसा लाकूड पोखरतो पण कमळात अडकतो, तीच स्थिती नामाच्या बाबतीत भगवंताची होते.

**आजचे बोधवचन आहे - पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे, तसे नाम हे मनाचे जीवन आहे.**

## हरिपाठ

आधुनिक केसरी

मनुष्याने हे ध्यानात ठेवून अखंड नाम घेण्याचा प्रयत्न करावा. हेचमोठे पुण्य. नाम सतत घेतले पाहिजे. वेळ मिळाला की नाम घेतले पाहिजे. असे करता आले तर नामाशिवाय क्षण ही फुकट जाणार नाही. नामस्मरणाला वेळ मिळत नाही ही लंगडी सबब आहे. जेवढा रिकामा वेळ मिळतो तेवढ्या वेळात जरी रोज नामस्मरण केले तरी नामाच्या राशी पडतील. खरोखर आपण रोज किती वेळ फुकट घालवितो.

आधुनिक केसरी

बुधवार, १८ जानेवारी २०२३




adhunikkesari.com Adhunik Kesari

# 1 फेब्रुवारीला उडणार बंद पडलेल्या गंगापूर साखर कारखान्याच्या प्रचाराचा धुराळा

## अनेक दिग्गजांची बंद पडलेल्या कारखान्याच्या निवडणुकीत लागणार प्रतिष्ठा पणाला,123 उमेदवारी अर्ज वैध

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर : जामगाव येथील गंगापूर सहकारी साखर कारखाना गेल्या 15 वर्षांपासून बंद पडलेला आहे त्यामुळे कारखाना अवसायानात निघाला व थकीत कर्जपोटी बँकेने 25 वर्षासाठी कारखाना खासगी व्यक्तीस भाडयापोटी दिलेला आहे मात्र असे असतानाही या कारखान्याची पंचवार्षिक कारखान्याची निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊन 213 उमेदवाराचे अर्ज वैध ठरले असून 31 जानेवारीला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असून 31 जानेवारीला चिन्हवाटप होणार असून एक फेब्रुवारीपासून बंद पडलेल्या साखर कारखान्याच्या प्रचाराचा धुराळा उडणार आहे.**

या निवडणुकीच्या विजयी निकालावरच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या निवडणुकीची रंगीत तालीम ठरणार आहे त्यामुळे तालुक्यातील राजकीय सत्तेसाठी आसूसलेल्या पुढाऱ्याकडून या बंद पडलेल्या मतदाराला आकर्षित करण्यासाठी घोडेबाजार होणार असल्याची चर्चा जोर धरत आहे मात्र कारखान्याचा कणा असलेला कामगार आजही बेघर बेरोजगार असून शेतकरी हाडाचे काड करूण शेकडो टन ऊस उत्पाद्दीत करतो मात्र गेल्या पंधरा वर्षांपासून पश्चिम महाराष्ट्रातील साखरसम्राट शेतकऱ्याच्या घामाचा पैश्यावर दरोडा टाकण्याच्या प्रकार सर्रासपणे गेल्या पंधरा वर्षापासून घडत आहे मात्र आत्तातरी गंगापूर तालुक्यातील पुढाऱ्यानी राजकारण टाळीत शेतकरी हिताचा विचार करून एकत्र यावे व कामगार, ऊस उत्पादक शेतकरी यांचे भले करावे नसता आगामी निवडणुकीत पुढाऱ्यांना त्यांची जागा मतदार दाखवल्याशिवाय राहणार नाही.



गेल्या पंधरा वर्षांपासून बंद पडलेल्या गंगापूर सहकारी साखर कारखान्याची निवडणूकीचा निवडणूक कार्यक्रम सध्या घोषित झाला असून अनेक इच्छुक उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहे व 12 फेब्रुवारीला प्रत्यक्ष मतदान होणार असून दुसऱ्या दिवशी 13 फेब्रुवारीला लगेच निकाल घोषित होणार आहे. मात्र तालुक्यातील प्रस्थापित पुढाऱ्यांसाठी ही कारखाण्याची निवडणूक प्रतिष्टेची केली आहे मात्र हे पुढाऱ्यांचे कारखाना प्रेम फक्त बेगडी स्वरूपाचे असून शेतकरी देशोधडीला लावण्याचा एककलमी कार्यक्रम आहे . जेव्हढे कष्ट हे मंडळी बंद पडलेल्या कारखान्याच्या संचालक निवडीसाठी घेणार आहे तेवढे कष्ट सगळ्या पुढाऱ्यांनी कारखाना चालू करण्यासाठी घेतले असते तर कारखाना कधीच चालू होऊन शेतकऱ्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले असते मात्र फक्त कारखान्याला नाव लावण्यासाठी घेत आहे ती धडपड केविलवानी असून या निवडणुकीत कोणाच्या पारडयात विजयश्री हेचली जाते ते पाहणे प्रतिस्थेचे आहे मात्र शेतकरी व सभासद, कामगार यांना व तालुक्यातील जनतेला हे आता कळून चुकले आहे की सब घोडे बारा टक्के त्यामुळे होणारी निवडणूक ही घोडेबाजारातच होईल यात शंका नाही . **भाऊसाहेब शेळके पाटील, (शेतकरी नेते तथा आप तालुका अध्यक्ष गंगापूर)**

## प्रसिद्ध प्रवचनकार ह. भ. प. प्रदीप महाराज मुळे, गोंदीकर यांचे प्रवचन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्री एकनाथ संशोधन मंदिर औरंगाबाद आयोजित डॉ. मोतीलाल पटेल, नारायणराव हंबर्डे व न्या. बळवंतराव घाटे यांच्या स्मृती प्रीत्यर्थ प्रसिद्ध प्रवचनकार ह. भ. प. प्रदीप महाराज मुळे, गोंदीकर यांचे प्रवचन आयोजित केले आहे, श्रीसंत निवृत्तिनाथ व त्यांची अभंगवाणी ( श्रीसंत निवृत्तीनाथ यात्रा त्र्यंबकेश्वर, विशेष दिनानिमित्त) हे प्रवचन संस्थेच्या बळवंतराव घाटे सभागृह, खडकेश्वर, औरंगाबाद येथे, बुधवार दि.18 जानेवारी 2023, सायं. 6.00 वाजता आयोजित केले आहे, जास्तीतजास्त भाविकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आयोजक समितीच्या सचिव सौ. श्यामल भोगले व कार्यकारी अध्यक्ष डॉ. म. ह. सावजी यांनी कळविले आहे. काही अडचण असल्यास मो. 7709589511 या नंबरवर संपर्क करावा.

## थंडीचा जोर कमी होणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सध्या देशाच्या विविध भागात थंडीची लाट पसरली आहे. थंडीचा कडाका वाढल्यामुळं अनेक ठिकाणी जनजीवन देखील विस्कळीत झालं आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी ठिकठिकाणी नागरिकांनी शेकोट्या पेटवल्या आहेत. अशा स्थितीत भारतीय हवामान विभागाकडून दिलासादायक बातमी समोर आली आहे. अशा परिस्थितीत भारतीय हवामान विभागाकडून दिलासादायक बातमी समोर आली आहे. उत्तर आणि पश्चिम भारतात लवकरच थंडीच्या लाटेची तीव्रता कमी होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळं नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

थंडीचा जोर वाढला आहे. त्याचा नागरिकांना त्रास होत असून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचं चित्र दिसत आहे. दिवसेंदिवस थंडी वाढतच आहे. त्यामुळं हा थंडीचा जोर कधी कमी होणार याची नागरिक प्रतिक्षा करत आहेत.

अशात हवामान विभागानं दिलासा देणार बातमी दिली आहे. येत्या 19 जानेवारीपासून म्हणजे गुरुवारपासून उत्तर भारत आणि पश्चिम भारतात थंडीची लाट कमी होणार असून, नागरिकांना थंडीपासून दिलासा मिळणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. सध्या दिल्लीच्या अनेक भागांमध्ये आणि पंजाब, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या काही भागात थंडीची लाट कायम आहे. लोधी रोड आणि सफदरजंग इथे 1.6 अंश आणि 1.4 अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. त्यामुळं थंडीचा जोर अधिक वाढला आहे. मात्र येत्या 19 जानेवारीपासून नागरिकांना थंडीपासून दिलासा मिळणार आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, 18 जानेवारीपर्यंत राजस्थान, पंजाब आणि हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीच्या अनेक भागात थंडीची लाट कायम राहणार आहे. 17 ते 19 जानेवारी दरम्यान उत्तर प्रदेश आणि बिहारच्या विविध भागात थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश आणि कच्छमध्ये 17 ते 18 जानेवारीला थंडीची लाट येण्याची शक्यता आहे.

## सोन्याच्या दरांत विक्रमी उसळी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकीकडे मंदीचे सावट आहे, तर दुसरीकडे सोने दिवसेंदिवस वधारत आहे. लग्नसराईमुळे सोन्याची मागणी देखील दिवसें-दिवस वाढत चालली आहे. आता सोन्याचे दर 56 हजारांवरुन थेट 57 हजारांच्या आसपास पोहोचले आहे. सोन्याच्या दरांनी 28 महिन्यांचा रेकॉर्ड ब्रेक केला आहे. नवीन वर्षाची सुरुवात माहागाईनेच झाली आहे. कोरोनाकाळात सोन्याचे दर प्रतितोळा 56 हजार रुपयांवर पोहोचले होते. मात्र इंडियन बुलियन ज्वेलर्स असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार, 16 जानेवारी रोजी सराफा बाजारात 24 कॅरेट सोन्याचा दर जीएसटी वगळता 56 हजार 883 रुपये प्रतितोळा एवढा झाला आहे. अशा प्रकारे सोन्याच्या दराने पुन्हा नवा उच्चांक गाठला आहे. काही वर्षांपासून दरांत विक्रमी उसळी झाल्याचे पाहायला मिळत आहे.

## धर्माबाद ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने 'रस्ता सुरक्षा अभियान साजरे'

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** राज्यात दरवर्षी रस्ता सुरक्षा सप्ताह हा वर्षाच्या सुरुवातीस जानेवारी महिन्यात घेतला जातो या निमित्ताने रस्ता सुरक्षा अभियान राबविले जाते शासन स्तरावर परिवहन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, शालेय शिक्षण विभागाच्या वतीने हा अभिमान राबविले जाते, तरी आज रस्ता सुरक्षा सप्ताह २०२३ जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भोसीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ.वेणुगोपाल पंडित वैद्यकीय अधिक्षक व डॉ इकबाल शेख यांच्या निरीक्षणाखाली ग्रामीण रुग्णालय धर्माबाद ग्रामीण रुग्णालयाचे वतीने दि. १७ जानेवारी २०२३ रोजी धर्माबाद महाराष्ट्र बस स्थानक (बस स्टँड) येथे वाहन चालक, वाहक, खाजगी वाहन-चालक यांची नेत्र तपासणी ,उच्च रक्तदाब, मधुमेह, एचआयव्ही टेस्ट करण्यात आले.

तसचे पायी चालताना नेहमी रस्त्याच्या उजव्या बाजूने चाला व गाडी चालवताना मद्यप्राशन करू नये या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. सुरक्षितता ही फक्त घोषणा नाही, जीवनाचा एक मार्ग आहे. रस्ता सुरक्षेबाबत लोकांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी देशात 'रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा' केला जातो.

यंदा दिनांक ११ जानेवारी ते १७ जानेवारी या कालावधीत केंद्र सरकारचे रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय रस्त्यांवरील सुरक्षितता सुधारण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि सर्व संबंधितांना या निमित्ताने योगदान देण्याची संधी देण्यासाठी 'रस्ता सुरक्षा सप्ताह' आयोजित करण्यात येतो. रस्ते सुरक्षा



सुधारण्यासाठी नवीन कायदे किंवा नियम लागू करणे, रस्ते सुरक्षित करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान किंवा पायाभूत सुविधांची अंमलबजावणी करणे किंवा सीट बेल्ट, हेल्मेट आणि इतर सुरक्षा उपायांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी मोहिमेचा प्रचार यांचा समावेश असतो. रस्ता सुरक्षेबद्दल जागरूकता वाढवून आणि त्यात सुधारणा करण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांमुळे, राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह भारतीय रस्त्यांवर सुरक्षिततेची संस्कृती निर्माण करण्यास मदत करतो आणि अपघात आणि मृत्यूची संख्या कमी करण्यास मदत करतो. हे केवळ सामान्य लोकांच्या सुरक्षिततेसाठीच नाही तर देशाच्या आर्थिक विकासासाठीही महत्त्वाचे आहे, कारण रस्ते अपघातांचा उत्पादकता आणि आर्थिक वाढीवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो व रस्त्यावर कुठेही अपघात झाला तर टोल फ्री १०८ क्रमांक फोन करा अपघाताच्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाची रुग्णवाहिका येईल असे डॉ.वेनुगोपाल पंडित यांनी बोलताना म्हणाले यावेळी , बसस्थानक प्रमुख एम.पी.यडपलवार, नितीन आडे, समुपदेशक विकास आगळे, निलेश जाधव,प्रयोगशाळा तंत्रज्ञ, बालाजी चव्हाण , मनोज कांबळे यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या रस्ता सुरक्षा सप्ताह पार पडले.

## नड्डांचा कार्यकाळ वाढवला

आधुनिक केसरी

जे. पी. नड्डा यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा काळ वाढवण्यात आला आहे. जून २०२४ पर्यंत जे. पी. नड्डाच भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष असतील असे जाहीर करण्यात आले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ही घोषणा काही वेळापूर्वीच केली. भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ संपल्यानंतर भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची माळ दुसऱ्या कुणाच्या गळ्यात पडणार का? याची चर्चा सुरू होती. मात्र तसे घडलेले नाही. जे. नड्डा हे जून २०२४ पर्यंत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष असणार आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने जे. पी. नड्डांकडे संघटनात्मक जबाबदारी देण्यात आली आहे. जे. पी. नड्डा यांनी सोमवारी एक भाषण केले होते त्यात ते भाजपाच्या कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना उद्देशून म्हणाले होते की मी तुम्हाला सूचना देतो, माहिती घेतो हे कधी तुम्हाला आवडतही नसावं पण मी पक्षाचा अध्यक्ष आहे त्यामुळे माझी ही जबाबदारी आहे. त्यापुढेही देत राहणार आहे, असेही सांगितले होते. त्यामुळे जे. पी. नड्डा यांना मुदतवाढ मिळू शकते याचे संकेत मिळालेच होते. त्यानुसार भाजपाच्या कार्यकारणीमध्ये राजनाथ सिंह यांनी जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ वाढवला जावा हा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला सगळ्यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ वाढवला गेला आहे अशी घोषणा केली. जे. पी नड्डा यांचा कार्यकाळ वाढवण्यात आल्यानंतर सर्वात मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे ते म्हणजे लोकसभा निवडणूक. कारण २०१४ मध्ये भाजपाला २८०+ जागा मिळाल्या होत्या. त्यावेळी राजनाथ सिंह हे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. त्यानंतर २०१९ मध्ये अमित शाह हे राष्ट्रीय अध्यक्ष होते. त्यावेळी भाजपाला ३०३ जागा मिळाल्या आणि प्रचंड बहुमत मिळाले. आता जे. पी. नड्डा भाजपाचे ४०० + जागांचे लक्ष्य पूर्ण करणार का हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. १९८६ पासून जे. पी. नड्डा हे राजकारणात सक्रिय झाले. वयाच्या ३३ व्या वर्षी त्यांनी आमदारकीची निवडणूक लढवली होती आणि ती जिंकली होती. जे. पी. नड्डा हे अमित शाह यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. कमीत कमी प्रकाशझोतात राहून जास्तीत जास्त काम करणे हे जे. पी. नड्डा यांचे कौशल्य आहे.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

## पाक घुसखोरांपासून भारताला धोका ?

आधुनिक केसरी

**भारताचे शेजारी असलेले श्रीलंका व पाकिस्तान हे दोन्ही राष्ट्र आर्थिक संकटात सापडले आहेत.पाककडील विदेशीमुद्रा भांडार संपत आला आहे.त्यामुळे तेल अन्नधान्याची भीषण संकट निर्माण झाले आहे.त्यात आर्थिक मंदीची लाट,करोना,पुराचे संकटाने आर्थिक कबंरडे मोडले आहे.येत्या काही दिवसात पाक दिवाळखोरी निघेल!ज्या पाकिस्तानने दहशवादी संघटनेची फॅक्ट्री घडली.त्याच दहशवादी संघटना भस्मापूर झाल्या आहेत.पाक सैन्य तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टी पी.पी.) यांच्यात संघर्ष वाढत चालला आहे.यामुळे पाकचे नागरीक पलायनाच्या तयारीत आहेत.ते भारतात घुसखोरी करण्याची दाट शक्यता आहे.**

केंद्रात भाजपा मोदी सरकार आल्यापासून महागाई,बेरोजगारी वाढली देश विकायला काढला आहे,असे विधान काँग्रेस नेते करत असतात. वास्तविक केंद्रात केवळ तेरा वर्षे बिगर काँग्रेसचे सरकार होते. उर्वरित ६२ वर्षे काँग्रेसची केंद्रात सत्ता होती.तेंव्हा महागाई,गरीबी,बेरोजगारीचे प्रश्न नव्हते काय! तेंव्हा हे प्रश्न पूर्णपणे सुटले होते काय ? भारताची अर्थव्यवस्था कोलमडली आहे,असे म्हंटले जाते. जागतिक पातळीवर अर्थव्यवस्थेचा विचार केला असता,करोनाचे संकट आर्थिक मंदीची लाट,रूस व युक्रेन युध्दामुळे जगातील अनेक राष्ट्रांना आर्थिक फटका बसला आहे.आपणाला आश्चर्य वाटेल! जगातील विकसित असलेले देश सर्वात मोठे कर्जदार आहेत.ब्रिटनएकूण कर्ज ८.९८१ ट्रिलियन डॉलर, प्रतिव्यक्ती १४४.३३८ डॉलर,अमेरिका- १४. ५९० ट्रिलियन डॉलर, प्रतिव्यक्ती ४६ हजार ९२९ , जर्मनी- ४.७१३ ट्रिलियन डॉलर प्रति व्यक्ती ५७,७५५ डॉलर,हॉलंड- ३.७३३ट्रिलियन डॉलर, प्रतिव्यक्ती २२५,८१४ डॉलर,आणि फ्रान्स- ४,६९८ट्रिलियन डॉलर,प्रतिव्यक्ती ७४,६१९ डॉलर इतका आहे या देशाच्या कर्जाचे प्रमाण जीडीपी.च्या शंभर पासून चारशे टक्यावर आहे.उत्तर युरोप व चीन स्वतः आर्थिक संकटात सापडला आहे. भारताचे शेजारी राष्ट्र श्रीलंका आणि पाकिस्तान कंगाल झाल्याचे दिसत आहे. तर दुसरीकडे भारताने २०२२ ब्रिटनला मागे टाकले आहे.तो जगात अर्थव्यवस्थेत पाचव्या क्रमांकावर आहे. भारताकडे परकीय चलन ८४५.७ अब्ज डॉलर,तर ब्रिटनचे ८१६ अब्ज डॉलर इतके आहे. तरी भारतात गरीबी का? असा प्रश्न विचारला जातो,त्याला कारण भारताची लोकसंख्या १३८ कोटीवर पोहचली आहे. भारताचे प्रतिव्यक्ती उत्पन्न केवळ २ हजार डॉलर तर ब्रिटनचे प्रतिव्यक्ती ४५ हजार आहे. ब्रिटनमध्ये महागाई व करवाढी रोखण्यासाठी करकपातीचे आश्वासन देऊन लिझ ट्रस पंतप्रधान झाल्या होत्या.पण आपण हे आश्वासन पूर्ण करू शकत नाही,हे लक्षात आले, त्यांनी ४५ दिवसात त्यांनी पंतप्रधान-पदाचा राजीनामा दिला.त्यानंतर ऋषि सुनक हे ब्रिटनचे पंतप्रधान झाले.

भारताचा २०२२ -२०२३ मध्ये विकास दर ८ ते ८.५ राहण्याचा अंदाज आहे. अर्थव्यवस्थेत २०२१-२२ मध्ये ९.२ टक्के वृध्दी झाली आहे.कृषी विकास दर ३.६, औद्यौगिक क्षेत्राचा वेग ११.८ टक्के होता. जागतिक बँक,आशियाई विकास बँक,आणि आंतराष्ट्रीय नाणे निधीच्या अनुसार भारताची अर्थव्यवस्था जगात वेगाने वृध्दींगत करणारी असणार आहे. त्यामुळे जगातील सर्व राष्ट्र भारताकडे मैत्री हात पुढे करत आहेत. तेंव्हा भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. बेरोजगारांचे प्रमाण २० लाखाने घटले असून एकूण संख्या ३९.४६ कोटी इतकी आहे. यात जम्मू काश्मीर ३२.८ राजस्थान- ३१.४ झारखंड १७.३ टक्के बेरोजगारी अधिक आहे. तसेच देशात दारिद्र्याचे प्रमाण आठ वर्षात २०११ ते २०१९ पर्यंत१२.३ टक्यांनी घटले आहे.देशात २०११ दारिद्र्याचे प्रमाण २२.५ तर २०१९ मध्ये१०.२ टक्के इतके होते.देशात अन्न धान्य भांडार भरपूर आहे. तसेक जीवनावश्यक वस्तुंचा तुटवडा नाही.देशात डिसेंबर २०२२ महागाई दर ५.७२ तर किरकोळ महागाई दर ५.६६ टक्के इतका होता.किरकोळ महागाई दरात मागील वर्षाभरातील नीचांकी पातळी आहे. हीआकडेवारी बोलकी आहे,पण काँग्रेसला मान्य नाही.१९७२ मध्ये मुंबईत महिलांचा महागाई जीवनावश्यक वस्तुच्या टंचाई विरोधात काँग्रेस सरकारच्या विरोधात मृणालताई गोरे यांच्या नेतृत्वाखाली लाटणे मोर्चा काढला होता.डिझेल पेट्रोल चे दर वाढले तर चार चाकी व दोन चाकी गाड्या खरेदीत १५ ते २० टक्यापर्यंत वाढ झाली आहे.महागाई काय असते,हे खेड्यात गेल्याशिवाय कळत नाही.महागाईचे अनेक कारणे त्यात वाढती लोकसंख्या,मागाणी अधिक उत्पन्न कमी, वाढत्या गरजा अशी अनेक कारणे नाहीत.त्यातही आज मोठ्या शहरात चोचले पुरविणारे अलिशान हॉटेल,चित्रपटगृह,मॉल गर्दी पहावयाला मिळते आहे.त्यात पर्यटकांची संख्या वाढतेय आहे. बार, हॉटेल, चित्रपटगृह,दारूची दुकाने ओस पडली आहेत काय? यांना कोठे महागाई ?काँग्रेस नेते हे सामान्य माणसाची दिशाभूल करत आहे.गॅस सिलेंडरचे दर १ हजारा- पर्यंत गेले सांगितले जाते.पण काँग्रेस सरकारने २०१४ पूर्वी जाता -जाता तेल कंपन्याचा तोटा भरून काढण्यासाठी १.४० लाख रुपायाचे बाँड विक्रीला काढले होते,त्या व्याजाची सुमारे ७० हजार कोटी रूपये मोदी सरकारला द्यावे लागत आहेत. डिझेल व रॉकेलचे अनुदान (सबसिडी) सुमारे ६० हजार कोची वर्षाला बचत होत आहे.गॅस सिलेंडरची सबसिडी ही खासदार,आमदार,धनदांडग्यांना दिली जात होती,ती बंद केली आहे. देशात इंडियन एअर लाईंन्स कंपनी तोट्यात असताना काँग्रेस सरकारने १११ विमानाचा ७० हजार कोटीचा खरेदीचा सौदा केला.त्यामुळे ही कंपनी टाटा ने १८ हजार कोटी खरेदी केली.तर महाराष्ट्रात ५५ सहकारी साखर कारखाने तोट्यात आणले व स्वतः च काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांनी विकत घेतले. महाराष्ट्रातील सहकारी संस्था,बँका बुडविले. परवा राज्याच्या महाविकास आघाडीच्या कार्यकाळातील भ्रष्टाचाराचे एक आदर्श उदाहरण उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. मुंबईच्या अजमेरा बिल्डर्सनी २०१० दहीसर भागातील शंभर टक्के अतिक्रमण असलेली जमीन २.५५कोटीला विकत घेतली.नंतर बिल्डर्सने मुंबई मनपाला ती अधिग्रहण करावी,यासाठी तगादा लावला,अनेक आयुक्तांनी ही जमीन विकत घेऊ नये,असे लेखी नमुद केले होते.तीपण महाविकास आघाडीचे सरकार येताच महापालिकेने ती जमीन ३४९ कोटी रुपायाला विकत घेतली.यावर बिल्डर्सचे समाधान झाले नाही तो ९०० कोटीच्या मागणीसाठी न्यायालयात गेला आहे.


तेंव्हा वास्तविक महाविकास आघाडीचे सरकारमध्ये खंडणी व खोके कोणे घेत होते? तत्कालिन पतंप्रधान राजीव गांधी म्हणाले होते,केंद्र गरिबांसाठी एक रूपया देते पण त्यांच्यापर्यंत १५ पैसे पोहचतात,हे माहित काँग्रेसने काही उपाययोजना केल्या नाहीत.ते ८५ पैसे कोणाच्या खिशात जात होते? देशात मोदी सरकार आले त्यानंतर थेट निधी,अनुदान देण्याची पध्दत सुरु केली. आता गरीब,लाभार्थी, शेतकऱ्यांच्या खात्यात पूर्णपणे पैसा जमा होवू लागली आहे.काँग्रेसने व राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्राला लुटले आहे काँग्रेस व दलाली करणाऱ्या बोक्यांचा धंदा बंद झाला आहे. म्हणून तर काँग्रेस व दलाल मंडळी मोदी सरकार विरोधात फडफड करत आहेत.ईडी व सी.बी.आय. च्या धाडी पडत आहेत.ज्या राजकीय नेत्यांनी भ्रष्टाचारातून जे कमावले ते गमावावे लागत आहे.यात गरीब माणसाला ईडी व सी.बी आय.ची भीती नाही.मोदी व भाजपा सरकार हे विरोधी पक्षाला लक्ष्य केल जातय,असे म्हंटल जातय! काँग्रेसची केंद्रात असताना भाजपाचे नेते भ्रष्ट होते तर ईडीचा वापर का केला नाही ?त्यांना यासाठी रोखल होत ?परवा तर पश्चिम बंगालमध्ये माजी मंत्र्याकडे कोट्यवधीचे घबाड सापडले आहे. राजकीय नेत्यांकडे अवैध संपत्ती,पैसा येतो कोठून? खर तर!मोदी सरकारने नोटा छापणे बंद केले पाहिजे.फक्त किमान वेतनाप्रमाणे इतकी रोख रक्कम देण्याची सोय असावी. तसेच खासदार आमदार यांचे वेतन मानधन बंद केले पाहिजे.काँग्रेसने तर देशातील महागाई लक्षात लोकप्रतिनिधीचे मानधन वेतन बंद करण्याची मागणी पाहिजे. काँग्रेस सरकारने सी.बी.आय.चा राजकीय वापर केला. त्यामुळे भाजपावर आरोप करण्याचा त्यांना अधिकार नाही.

भारत,पाकिस्तान श्रीलंकेला स्वतंत्र होवून राष्ट्रांना ७५ वर्षे झाली आहेत. आता श्रीलंका,पाकिस्तान हे मोठ्या आर्थिक संकट सापडले आहेत. श्रीलंकेने चीनकडून ५४ हजार कोटीचे कर्ज घेतले होते.श्रीलंकेकडे सरकारकडे पैसा नसल्याने वस्तु व तेल आयात करणे कठीण झाले आहे. लोकांना औषध व भाज्या मिळनासे झाले आहे. लोकांना दुध एक लिटर १९८० रुपये, किलो साखर २९० रूपये, तांदूळ ५०० रूपये किलो मिळत होते. पेट्राल व डिझेलसाठी दोन कि.मी च्या रांगा लागत होत्या. तेथे लष्कराला तैनात करावे लागले होते.राष्ट्रात महागाई गगनाला नागरीक हैराण झाले,ते रस्त्यावर उतरले व ते हिंसक बनले.जमावांनी राष्ट्रपतीच्या निवासस्थानात घुसून हैदोस घातला होता.श्रीलंकेत आर्थिक संकटामुळे अंधाधंदी माजली, हे जगाने पाहिले आहे. चीनच्या कर्जामुळे ९७ राष्ट्र आर्थिक संकटात सापडले आहेत.तीच परिस्थिती पाकिस्तानची झालेलीआहे.पाकने चीनकडून ४३ लाख कोटीचे कर्ज घेतले आहे.त्यांची विदेशीमुद्रा भांडार केवळ४..६२ अब्ज इतके आहे पाकने जीवनावश्यक वस्तु आयात करण्यासाठी पैसा नाही.पाकचा महागाई निर्देशांक ९.११ वर पोहचलेला आहे. गरिबांवर तर उपासमारीचे संकट ओढवले आहे. गॅस सिलेंडर १० हजार रुपये,पेट्रोल २७७ रूपये व डिझेल २४५ रूपये लिटर कांदे,बटाटे तीनशे ते चारशे किलो, गहू,दुध तेल दाळ या वस्तुचे भाव प्रचंड वाढल्याने सामान्य माणूस विकत घूवू शकत नाही. एक रोटी साठ रूपयाला मिळत आहे. लोक पीठासाठी भटकत आहेत. पीठाच्या थैलीचे वाटप करताना झुंबड उडाली, त्यात चार जणांना जीव गमावावा लागला. पाकने आर्थिक मदतीसाठी अरब,अमेरिका चीनकडे ( आबुकडे) कटोरा घेवून भीक मागतली,पण कोणीही पाकला भीक देण्यास तयार नाही.पाकने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे ( IMF) आर्थिक मदतीची मागणी केली आहे. येत्या काही दिवसात पाक दिवाळीखोरीत निघेल. दुसरीकडे पाकने पोसलेल्या तहरीक ए- तालिबान पाकिस्तान ( TPP) ही दहशदवादी संघटना आहे.तीच पाकसाठी डोकेदुखी होऊन बसली आहे. पाक हा पूर्णपणे इस्लामिक राष्ट्र करण्याच्या उद्देशाने आता पाक सैनिक व तालिबान संघटनेत संघर्ष होत आहे.त्यामुळे पाकमधील नागरीक पलायन करण्याच्या तयारीत असून ते भारतात घुसखोरी करू शकतात.पाकच्या घुसखोरीमुळे भारताच्या सुरक्षतेला धोका निर्माण होऊ शकतो.तेंव्हा भारताला सावध राहावे लागेल.

## योग आणि ध्यान ही काळाची गरज : श्री श्री रविशंकर

आधुनिक केसरी

**१९५६ साली दक्षिण भारतात जन्मलेले श्री श्री रविशंकर हे एक प्रतिभावान बालक होते.चार वर्षाचे असतानाच त्यांना श्रीमद्भगवद्गीता मुखोद्गत होती.युवावयातच अनेकदा ते ध्यानस्थ अवस्थेत दिसून येत.त्यांचे पहिले गुरु होते सुधाकर चतुर्वेदी,ज्यांनी महात्मा गांधी यांच्यासोबत बरीच वर्षे काम केले.त्यांच्याकडे वेद साहित्य आणि भौतिकशास्त्र अशा दोन्ही पदव्या आहेत. श्री श्री रविशंकर हे भारताच्या कर्नाटक राज्यातील शिमोगा इथे असताना दहा दिवसांच्या मौनावस्थेत असताना त्यांना 'सुदर्शन क्रिया', एक शक्तिशाली श्वसन प्रक्रिया प्राप्त झाली. कालांतराने सुदर्शन क्रिया ही आर्ट ऑफ लिविंगच्या शिबिरांचे मुख्य गुणवैशिष्ट्य बनली.**



श्री श्री रविशंकर यांनी आंतरराष्ट्रीय, नफा न कमावणारी, शैक्षणिक आणि मानवतावादी संस्था म्हणून आर्ट ऑफ लिविंगची स्थापना केली.या संस्थेचे शैक्षणिक आणि व्यक्तिमत्व-विकास कार्यक्रम हे तणाव निर्मुलनासाठी आणि निरोगी राहण्यासाठी लागणारी प्रभावी प्रक्रिया शिकवतात.केवळ एकाच प्रकारच्या जनसमुदायाला आवाहन न करता हे कार्यक्रम जगभरात आणि समाजाच्या सर्व पातळ्यांवर उपयुक्त ठरले आहेत. १९९७ साली त्यांनी इंटरनॅशनल असोसिएशन फॉर ह्युमन व्हॅल्यूज (IAHV) ही संस्था स्थापन केली. याचे मुख्य कारण होते ते म्हणजे दीर्घकालीन विकासाचे उपक्रम राबवणे आणि आर्ट ऑफ लिविंगबरोबर समन्वय साधून संघर्ष निवारण करणे. भारत,आफ्रिका,दक्षिण अमेरिका आणि जगभरात या दोन्ही संस्थांचे कार्यकर्ते युद्धपातळीवर दीर्घकालीन विकास कामे हाती घेत आहेत.४०,२१२ गावांमध्ये या संस्थेचे काम सुरु आहेत. एक नावाजलेले मानवतावादी नेता म्हणून श्री श्री रविशंकर यांच्याकडे बघितले जाते.त्यांच्या प्रेरणेने नैसर्गिक आपत्तीग्रस्त,अतिरेकी हल्ल्यात आणि युद्धात बचावलेले,उपेक्षित आणि सतत संघर्षात भरडल्या जाणा-या जमातीतील मुले अशा विविध परिस्थितीतील लोकांना दिलासा देण्याचे काम चालू आहे.त्यांच्या संदेशाच्या सामर्थ्याने अध्यात्मावर आधारित एक सेवा कार्याची लाट समस्त कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे.जगभर हे कार्यकर्ते आणीबाणीच्या परिस्थितीत या उपक्रमांना पुढे नेत आहेत.

एक अध्यात्मिक गुरु म्हणून श्री श्री रविशंकरजी यांनी योग आणि ध्यान या पुरातन परंपरांना पुनरुज्जीवीत केले आहे आणि २१व्या शतकाला शोभेल अश्या प्रकारे जगासमोर ठेवले आहे.प्राचीन ज्ञानाला पुनरुज्जीवन देण्याच्या पलीकडे जाऊन श्री श्री रविशंकरजी यांनी वैयक्तिक आणि सामाजिक परिवर्तनाची नवीन तंत्रे निर्माण केली आहेत. यात समावेश आहे तो सुदर्शन क्रिया® या प्रक्रियेचा,जिने तणावापासून मुक्ती मिळवण्यात,आंतरिक उर्जेचे स्रोत्र शोधण्यात आणि दैनंदिन जीवनात शांती मिळवण्यात करोडो लोकांना मदत केली आहे. ३१ वर्षांच्या अल्पावधीतच त्यांच्या कार्यक्रमांनी आणि त्यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या उपक्रमांनी १५२ देशांमध्ये जवळजवळ ३७ करोड लोकांचे जीवन लाभान्वित झाले आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ऐतिहासिक चित्रपटांची परंपरा यंदाही कायम




मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**हिंदी सिनेमाची सुरुवात पौराणिक, धार्मिक बरोबरच ऐतिहासिक पार्श्वभूमीवर मूकपटाने झाली होती.याचं कारण हे की जनमानसात यांच्याशी जुडलेल्या गोष्टी, किस्से,कथा-कहाण्या आणि घटना माहीत होत्या,लक्षात होत्या आणि भाषेशिवाय सिनेमा समजून घ्यायला सोपे पडत होते. नंतर सिनेमा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर बणण्याचा काळ सुरू झाला. शिवाय ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले सिनेमे प्रत्येक दशकात बनू लागले. आजदेखील सिनेनिर्मात्यांना त्यात स्वारस्य असल्याचे आगामी चित्रपटांच्या घोषणांवरून दिसून येत आहे. मूकपटाच्या काळात लोकप्रिय पौराणिक कथांवर सिनेमे बनवण्याचा एकप्रकारे पूरच आला होता. रामायण आणि महाभारत संबंधित सिनेमे मोठ्या प्रमाणात बनले.**

'कंस वध', 'लव कुश', 'कृष्ण सुदामा', 'महाभारत', 'वीर अभिमन्यू', 'राम रावण युद्ध', 'सीता वनवास' सारखे सिनेमे मोठ्या प्रमाणात पसंद केले गेले. याचबरोबर ऐतिहासिक पार्श्वभूमीवर बनलेल्या 'सम्राट अशोक', 'कालिदास', 'बाजीराव मस्तानी', 'छत्रपति संभाजी', 'राणा प्रताप' आदी मूकपटांना सिनेरसिकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. नंतर सामाजिक सिनेमांचा काळ आला.

मूकपट लोक मोठ्या चवीने पाहत होते कारण, लोकांसाठी पडदयावरच्या हालत्या-डुलत्या सावल्या त्यांच्यासाठी आश्चर्याचा विषय होता. ऐतिहासिक सिनेमांना लोकांनी पसंद केल्याने मोठ्या संख्येने अशा सिनेमांची निर्मिती व्हायला लागली. बहुतांश सिनेमे राजा-महाराजा,प्रसिध्द योद्धे आणि संतांच्या जीवनावर बनत होते. ऐतिहासिक सिनेमे प्रत्येक काळात बनले आणि आजदेखील बनत आहेत. स्वातंत्र्यानंतर ऐतिहासिक चित्रपटांचा जोर वाढला. या काळात सशक्त दावेदार होते सोहराब मोदी आणि त्यांची कंपनी मिनर्वा मूविटोन.त्यांनी 'पुकार', 'सिकंदर', 'पृथ्वीवल्लभ', 'मिर्झागालिब' सारखे सिनेमांची निर्मिती केली. 1952 मध्ये त्यांनी 'झांशी की रानी' चित्रपटाची निर्मिती केली, ज्यात झांशीच्या राणीची भूमिका त्यांची पत्नी मेहताब यांनी साकारली.यानंतर दोन वर्षांनी मिर्झा गालिब यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाची निर्मिती झाली,ज्याचे लेखन राजेंद्र सिंह आणि सआदत हसन मंटो यांनी केले. या काळात कोणी मुगल सम्राटांच्या जीवनावर आधारित तर कुणी शिवाजी महाराज आणि मराठा शासकांवर चित्रपट बनवत होते. स्वातंत्र्यानंतर एका बाजूला 'सलीम अनारकली' 'मुगले आजम', 'जहांगीर', 'ताजमहल' सारखे काही भव्य चित्रपट बनले, तर दुसऱ्या बाजूला देशभक्तीवर आधारित 'हकीकत', 'हिंदुस्तान की कसम', 'शहीद' सारखे काही यशस्वी पीरियड चित्रपटदेखील पाहायला मिळाले. हिंदी सिनेमा क्षेत्रातील त्रिमूर्ती- राज कपूर, दिलीप कुमार, देव आनंद-यांच्या दशकांनंतर जेव्हा बॉलीवुडमध्ये आमिर खान, शाहरुख खान, सलमान खान या तिकडीचा दबदबा वाढला तेव्हाही ऐतिहासिक चित्रपटांची निर्मिती सुरूच राहिली. अलीकडेच काही वर्षांत बनलेल्या ऐतिहासिक चित्रपटांमध्ये कंगना रानौत अभिनीत आणि दिग्दर्शित 'मणिकर्णिका', दीपिका पादुकोण, रणवीर सिंह अभिनीत 'बाजीराव मस्तानी' आणि 'पदमावत', ऋत्विक रोशन अभिनीत 'मोहेनजोदड़ो' आणि 'जोधा अकबर'. आमिर खान अभिनीत 'मंगल पांडे' आणि शाहरूख खानचा 'अशोका' आदी चित्रपटांनी हिंदी सिनेमा क्षेत्रात आपले स्थान बनवले. ऐतिहासिक सिनेमांची निर्मिती करणं जितकं कठीण तितकंच रिलीज दरम्यान विवादावरून टीकाकारांना सामोरं जाणं कठीण असतं. खासकरून भारतात चित्रपटांच्या रिलीज दरम्यान दुखावलेल्या भावनांना वाट मोकळी केली जाते. खरं तर प्रत्येक दुसऱ्या ऐतिहासिक चित्रपटाला वाद विवादाचा सामना करावा लागतो. संजय लीला भसांळी यांच्या 'पद्मावत' चित्रपटाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. इतकंच काय या वादामुळे चित्रपटाच्या नावात बदल करावा लागला. त्यानंतर 'मणिकर्णिका', 'सम्राट पृथ्वीराज' दरम्यानदेखील अनेक वाद समोर आले. आमिर खानच्या 'मंगल पांडे' मधील एक चुंबन दृश्य आणि काही अन्य दृश्यांबाबत चित्रपटावर विवाद उभा राहिला. अशाच प्रकारे संजय लीला भंसाळी यांचा 'बाजीराव मस्तानी' देखील वादाच्या भोवऱ्यात अडकला. 'जोधा अकबर' मध्ये ऐतिहासिक भूमिकांमध्ये छेडछाड केल्याप्रकारणावरून विवाद उभा राहिला. अशा चित्रपटांसाठी 200 ते 300 कोटी रुपये लागलेले असतात,त्यामुळे निर्मात्यांवर मोठा ताण येतो. गेल्या वर्षभरात आलेल्या बहुचर्चित चित्रपटांवर नजर टाकल्यास वेगवेगळ्या बायोपिक आणि इतिहासपटांचंही त्यात नाव दिसतं. पण सत्य इतिहास आहे तसा मांडण्याऐवजी या दिग्दर्शक आणि निर्मात्यांचा कल वास्तव घडामोडींना सिनेमॅटिक लिबर्टीच्या नावाखाली अतिरंजित कल्पकतेने मांडण्याकडे दिसून आला. त्यातून बरीचशी राजकीय,










सामाजिक आणि पर्यायाने आर्थिक गणितही साधली गेली. गेल्या वर्षी अशा धाटणीचे बरेच सिनेमे आले, त्यातल्या काहींना चांगलं यश मिळालं तर काही दणकून आपटले. त्यातल्या फ्लॉप सिनेमांची यादी करायची तर यशराज फिल्म्सच्या 'सम्राट पृथ्वीराज' चं नाव आधी घ्यावं लागेल. अक्षय कुमारने यात सम्राट पृथ्वीराज चौहान यांची भूमिका साकारली होती. आशुतोष राणा, संजय दत्त, साक्षी तन्वर, सोनू सूद अशी तगडी स्टारकास्ट असूनही हा सिनेमा चालला नाही. त्यानंतर ब्रिटिश सत्तेच्या कालखंडातील गोष्ट घेऊन आलेल्या 'समशेरा' लाही अपयशाचं तोंड पाहावं लागलं. 2015 ला घडलेल्या दोहा- कोची विमान दुर्घटनेवर आधारित 'रनवे 34' हा सिनेमाही फारसा चालला नाही.

एकीकडे बॉलीवूड यशापयशाच्यया गर्तेत गटांगळ्या खात असताना, प्रादेशिक सिनेमांनी मात्र वेगवेगळ्या इतीहासपटांच्या जोरावर बॉक्स ऑफिसवर वर्चस्व राखण्यात यश मिळवलं. यातलं सगळ्यात मोठं उदाहरण म्हणजे 1000 कोटींहून अधिक कमाई करणारा 'आरआरआर' हा तेलुगू सिनेमा. या सिनेमात अल्लूरी सीताराम राजू आणि कुमारम भीम या स्वातंत्र्ययोखद्ध्यांच्या जीवनातल्या एका कालखंडाचं कल्पकतेने सादरीकरण केलं गेलं होतं. दिग्दर्शक मणिरत्नमचा बहुप्रतिक्षित तमिळ सिनेमा 'पे पेन्नीयीन सेल्वनप 1 "ही याच वर्षी रिलीज झाला. चोल राजवटीवर आधारित असलेल्या या सिनेमाने 500 कोटींहून अधिक कमाई करत तिकीटनबारीवर आपलं वर्चस्व राखलं. एप्रिल 2023 मध्ये या सिनेमाचा दुसरा भागही येतोय. या वर्षात ऐतिहासिक सिनेमांचीही मोठी लाट उसळणार आहे. दिग्दर्शक-निर्माता करण जोहरने दिल्लीतल्या मुघल राजवटीवर आधारित 'तख्त' या सिनेमाची घोषणा केलीय. या सिनेमात विकी कौशल औरंगजेबाच्या भूमिकेत दिसणार आहे. अभिनेता बॉबी देओलही यावर्षी 'हरी हरा वीरा मल्लू' या तेलुगू सिनेमात औरंगजेबाचं पात्र रंगवताना दिसणार आहे. कुतुबशाहीतल्या एका अनाम वीराची शोर्यगाथा सांगणाऱ्या या सिनेमात "पॉवर स्टार' पवन कल्याण प्रमुख भूमिका साकारणार आहे. 1818 मध्ये लढली गेलेली भीमा - कोरेगावची लढाई महाराष्ट्राच्या इतिहासातली एक महत्त्वाची लढाई मानली जाते. या लढाईत महार 'योद्ध्यांच्या मदतीने इंग्रजांनी पेशव्यांचा पराभव केला. पेशवाईत अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीचं लढवय्या स्वरूप या लढाईमुळे समोर आलं. यावर आधारित 'द बॅटल ऑफ भीमाकोरेगाव' हा सिनेमा लवकरच प्रदर्शित होतोय. या ऐतिहासिक लढाईच्या नायकाची म्हणजेच सिदनाक इनामदाराची भूमिका अभिनेता अर्जुन रामपाल साकारतोय. गेल्या काही वर्षांत देशाच्या वैचारिक वर्तुळात गांधी विरुद्ध गोडसे आणि गांधी विरुद्ध सावरकर या राजकीय वादांनी थैमान घातलंय. त्याचे पडसाद वेळोवेळी साहित्यातून, नाटकांमधून उमटलेत. आता पुन्हा मोठ्या पडद्यावरही हा वाद नव्याने जिवंत केला जाणार असून, त्यांच्या निर्मिती आणि तिकीटबारीवरच्या व्यवसायात होणारा राजकीय हस्तक्षेप हा एक कळीचा मुद्दा ठरणार आहे. महेश मांजरेकर दिग्दर्शित 'स्वातंत्र्यवीर सावरकर'मध्ये अभिनेता रणदीप हुडा मध्यवर्ती भूमिकेत झळकणार आहे सप्टेंबर 2022 मधे रणदीपने मांजरेकरांच्या ऐवजी आपण हा सिनेमा दिग्दर्शित करणार असल्याचं जाहीर केलंय. 'गांधी गोडसे - एक युद्ध' हा राजकुमार संतोषी दिग्दर्शित सिनेमा या प्रजासत्ताक दिनाला प्रदर्शित होतोय.

महाभारतातील कर्ण याच्या जीवनावर आधारित 'महावीर कर्ण', ज्यात अभिनेता विक्रम आणि मल्याळम अभिनेता सुरेश गोपी दिसणार आहेत. हा पौराणिक चित्रपट कन्नड़, हिंदी, मल्याळम, तामिळमध्ये रिलीज होणार आहे.500 कोटी रुपये खर्चून तयार झालेला 'आदिपुरुष' चित्रपट भारतीय महाकाव्य रामायणावर आधारित आहे आणि जून 2023 मध्ये रिलीज होणार आहे. दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री समंथा रुथ प्रभूच्या 'शाकुंतलम' 17 फेब्रुवारीला हा चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. समंथा यात राजकन्येच्या भूमिकेत दिसणार आहे. ही शाकुंतला आणि दुष्यांत यांची प्रेम कहाणी आहे. राजा दुष्यंत भूमिका अभिनेता देव मोहन साकारत आहे. अल्लू अर्जुनची मुलगी अरहा लहानग्या शकुंतलाची भूमिका साकारत आहे. हा चित्रपट तमिळ, तेलुगू आणि हिंदी या भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. 1975 सालच्या आणीबाणीवर आधारित कंगना राणावतचा'इमर्जन्सी' येणार आहे. कंगना यात इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत आहे.

# शुकदास महाराज: दगडात देव नाकारणारे



सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

आधुनिक केसरी


**माझं मुळगाव बुलढाणा जिल्ह्यातील ब्रम्हपुरी जरी असले तरीही जन्म सुलतानपूर ता. लोणार. जन्मापासून 11 वि पर्यंतचे शिक्षण सुल्तानपूर येथेच.त्यामुळे जन्मगाव सुल्तानपूर बद्दल मनात कायमस्वरूपी एक हळवा कप्पा राहिला आहे. गाव ब्रम्हपुरी असल्याने सुखदुःख,लग्नसमारंभ अशा विविध निमित्ताने गावी येणे असायचे. दरम्यान ब्रम्हपुरी नजीक विवेकानंद नगर हिवरा आश्रम हे गाव. याच गावात पू शुकदास महाराज यांनी 14 जानेवारी 1965 रोजी विवेकानंद आश्रमाची स्थापना केली. आमच्या ब्रम्हपुरी फाट्यावर सर्वसाधारण बसेसचा थांबा आणि जलद एसटी बसेस चा थांबा लागूनच असलेल्या हिवऱ्याला. त्यावेळी बैलगाडीने हिवऱ्याला सोडून दिल्या जायचे अथवा आमचे काका स्व शेषराव पवार यांच्याकडे राजदूत मोटारसायकल असायची.त्या गाडीवर काका आईला व मला नेऊन पोहचवायचे.**

ब्रम्हपुरी ह्या गावाला 18 च्या दशकातील केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा. ब्रम्हपुरी येथे हिवरा बु,दुधा,गजरखेड, पाचला,बाऱ्हई,अशा वेगवेगळ्या गावातून शाळा शिकण्यासाठी विद्यार्थी पायी यायचे. विवेकानंद नगर हिवरा आश्रम हे गाव त्यावेळी अस्तित्वात नव्हते. ब्रम्हपुरी फाट्यावर बगीचा म्हणून बसेस चा थांबा होता.अनेक खेड्यातील लोकं बसेस मध्ये बसण्यासाठी ह्या बगीचा स्टॉप वर यायची.नंतर 14 जानेवारी 1965 रोजी पू शुकदास महाराज यांनी विवेकानंद आश्रमाची स्थापना केली.आश्रम उभा केला,वैद्यकीय सेवा सुरू केली.कोराडी प्रकल्प झाल्यानंतर शेवगा व शेलगाव काकडे ह्या गावचे पुनर्वसन झाले. शेवगा येथील नागरिक हिवऱ्याला स्थलांतरित झाले.आणि शेलगाव काकडे येथील अर्ध्यापेक्षा जास्त नागरिक हिवरा आश्रम नजीक पोखरी फाट्यावर स्थायिक झाले. ह्या गावाला शिवाजी नगर ह्या नावाने ओळखल्या जाऊ लागले. पू शुकदास महाराज यांनी रुग्णसेवेसोबतच शाळा आणली आणि बघता बघता ह्या गावाला एक वेगळी प्रतिष्ठा प्राप्त झाली, ब्रम्हपुरी फाट्याचे महत्व कमी होत हिवरा येथे जलद बसेस थांबायला लागल्या, सर्वसाधारण बसेसचा थांबा ब्रम्हपुरी फाटा राहिला. विवेकानंद आश्रम उभा करणाऱ्या पू शुकदास महाराज यांचे शिक्षण जेमतेम ४ था वर्ग. मात्र त्यांना आरोग्य क्षेत्रातले अगाध ज्ञान. अनेक रुग्णावर उपचार करून त्यांनी हजारोना व्याधी मुक्त केले.

एखादा सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेला माणूस असामान्य कार्य करू शकतो.हे दाखवून देण्याचे काम शुकदास महाराज यांनी केले. युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांची जयंती जगभर साजरी केली जाते. हिवरा आश्रम येथे ज्या भव्य प्रमाणात साजरी केल्या जाते, त्या भव्य प्रमाणात इतरत्र कुठे साजरी होत असेल असे वाटत नाही. पौष वद्य पंचमी ते सप्तमी दरम्यान हा जयंती उत्सव मोठ्या स्वरूपात साजरा होतो. एकाच वेळी शिस्तबद्ध पद्धतीने लाखो लोकांना महाप्रसादाचे वितरण केल्या जाते.हा सोहळा अशा पद्धतीने आणि एवढ्या शिस्तीत कुठेही होत असल्याचे ऐकिवात नाही. तिन्हीही दिवस वेगवेगळे व्याख्याते,कीर्तनकार,प्रवचनकार,नामांकित गायकांचे भरगच्च कार्यक्रम असतात. प्राचार्य शिवाजीराव भोसले सारख्या वक्त्याचे व्याख्यान,अजित कडकडे सारख्या गायकाचे गायन,सत्यपाल महाराजांसारखा समाजप्रबोधनकाराचे कीर्तन,प्रल्हाद शिंदे सारख्या गायकाचे गायन, मा म देशमुखांचे व्याख्यान अशी अनेक कार्यक्रमे आश्रमाचे स्वामी विवेकानंद जयंती महोत्सवात झालेली आहेत, होत आहेत. शुकदास महाराज हे दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्व. कुणी त्यांना महाराज मानत असले तरीही त्यांनी कुणाला अंगारा दिला नाही.कुणी देव देखील म्हणत असले तरीही देव ह्या कल्पनेला नाकारणारे ते होते व माणसात देव शोधण्याची त्यांची वृत्ती होती.म्हणूनच " आम्हांसाठी येथे सर्वांची शरीरे,आहेत मंदिरे ईश्वराची " असा भाव व्यक्त करत , " शुकदास म्हणे,तो मी खरा,माझ्या मी करतो आरतीला" असे म्हणून स्व स्वरूपाची आरती देखील ते करत. विवेकानंद आश्रमाच्या माध्यमातून आरोग्यसेवेसह शिक्षणाची अनेक दालने त्यांनी उभी केली. कॉन्व्हेंट पासून पदवीच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.राज्यात नामांकित असलेले कृषी महाविद्यालय उभे केल्याने राज्यासह इतर राज्यातील विद्यार्थी इथे पदवी घ्यायला येतात. आणि आता अलीकडे तर नर्सिंग आणून मुलींसाठी रोजगार मिळण्याची सोय उपलब्ध करून दिली.




मला आठवतं, अशोकराव चव्हाण राज्याचे मुख्यमंत्री असतांना चव्हाण साहेबांचे निकटस्थ असलेले स्व सुभाषराव झनक हे राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री होते.अशोकराव चव्हाण यांच्याशी त्यांचे सलोख्याचे नाते.स्व सुभाषराव झनक हे युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष असतांना अशोकराव चव्हाण हे त्यांच्या कार्यकारिणीत पदाधिकारी होते.नंतर तेच अशोकराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी जाणीव ठेवत सुभाषराव झनक यांना मंत्रिमंडळात घेतले आणि विशेष म्हणजे स्वतःच्या नांदेड जिल्ह्याचे आणि अकोला जिल्ह्याचे त्यांना पालकमंत्री केले.मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्व. सुभाषराव झनक यांना दिल्याने त्यांचे आणि मुख्यमंत्र्यांचे ऋणानुबंध अधोरेखित होतात. आणि दोन जिल्ह्याचे त्या मंत्रिमंडळात पालकमंत्री असणारे स्व सुभाषराव झनक हे एकमेव मंत्री होते हे विशेष ! स्व सुभाषराव झनक यांच्या त्याच संबंधाचा फायदा विवेकानंद आश्रमासाठी झाला.गोरगरिबांच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लागावा म्हणून ग्रामीण रुग्णालय हिवरा आश्रम येथे होण्यासाठी पू. शुकदास महाराज गत कित्येक वर्षांपासून प्रयत्नरत होते. त्यावेळी मी स्व. सुभाषराव झनक यांचा स्वीय्य सहायक म्हणून काम करत होतो. आश्रमाची मंडळी मंत्रालयात यासाठी सारख्या चकरा मारत असत.तत्कालीन मंत्री मधूकरराव चव्हाण,यांच्याकडे देखील आश्रमाच्या पदाधिकारी यांचा तगादा सुरू होता. लाल फित शाहित अडकलेले हे प्रकरण काहि केल्या मार्गी लागत नव्हते.याच कामासाठी आश्रमाचे तत्कालीन सहसचिव माझे स्नेही श्री विष्णुपंत कुलवंत मुंबईला आले.मी त्यांना आमच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान जवळ असलेल्या सारंग -५ या बंगल्यावर बोलावले.6,7 दिवस कुलवंत सर आमच्या बंगल्यावरच. एखाद्या पाहुण्यांसारखी मी त्यांची सोय घेण्याची सूचना कर्मचाऱ्यांना केली. त्यावेळी मी स्वतः याबाबतचे मुख्यमंत्र्यांना स्व. सुभाषराव झनक साहेबांचे पत्र टाईप करून कॅबिनेट ला जातांना साहेबांना दिले.साहेबांना मी स्वतः आग्रह केला. स्व सुभाषराव झनक साहेब देखील आश्रमाचे आणि महाराजांचे कार्य जाणून होतेच आणि त्यांनी देखील युद्धपातळीवर हिवरा आश्रम चे ग्रामीण रुग्णालय तत्कालीन मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण साहेबांकडून प्राधान्याने मंजूर करून घेतल्याने महाराजांचे गोरगरिबांच्या आरोग्याबाबतची जी कळकळ होती ती मार्गी लागली.आज आश्रमानेंच दिलेल्या जागेवर ग्रामीण रुग्णालय सुरू आहे ,वेगवेगळ्या क्षेत्रात मोलाची कामे करणाऱ्या शुकदास महाराजांनी विवेकानंदांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार सर्वदूर केला. अकोला,पातूर,माटुंगा येथे रुग्णसेवा करत आश्रम उभे केले. यावर्षी 12 जानेवारी ते 14 जानेवारी दरम्यान विवेकानंद जयंती महोत्सव लाखो लोकांच्या साक्षीने संपन्न झाला.



विवेकानंद आश्रमात साजरा होणारा उत्सव हा 58 वा होता.मात्र शुकदास महाराज नसतानाच उत्सव हा सहावा होता. यापूर्वी च्या उत्सवात त्यांनी जे आशीर्वाचन दिलेले असायचे त्याची चित्रफीत यावर्षी देखील दाखविण्यात आली. आणि ही चित्रफीत बघतांना आश्रमाच्या उभारणीचा आणि महाराजांच्या कार्याचा जीवनपट च नजरेसमोर तरळला. शुकदास महाराजांनी सर्वांप्रति "गोडवा" जोपासला. टिकाकारांच्या टीका हसत हसत स्वीकारल्या.त्याची चिंता केली नाही.शेवटपर्यंत आश्रमाच्या विकासाचा रथ पुढे नेत राहिले, आज महाप्रसादाची भव्य पंगत बसली होती, माझी नजर अचानक त्या टॉवरकडे गेली,ज्या टॉवरवरून महाप्रसादासाठी उसळलेला जनसागर महाराज डोळ्यांत साठवायचे, क्षणभरासाठी महाराजांची ओझरती आकृती दिसल्याचा आभास मनात निर्माण झाला,पण हा आभास होता, वास्तव नाही, माणसात देव शोधणारा तर निघून गेला होता दिगंताच्या सफरीला, कधी न परतण्यासाठी, माझ्या डोक्यात तरंगत होत्या महाराजांच्या अभंगातल्या समष्टीच्या भुजा बळकट करणाऱ्या ओळी

**'योगिक क्रियेचे नाही मला ज्ञान ग्रंथाचे वाचन केले नाही**
**शुकदास म्हणे काय मागू देवा फक्त लक्ष ठेवा दीनावरी'**

# साप हा शेतकऱ्यांचा मित्र



सागर सोनवणे
परभणी

आधुनिक केसरी

**आपल्या देशात दरवर्षी जेवढे धान्य पिकवले जाते, त्यापैकी २५ ते ३० टक्के धान्य उंदीर नष्ट करतात. आपण उंदीर मारण्यासाठी जी साधने वापरतो ती अती वापरामुळे नंतर परिणामकारक ठरत नाहीत. कारण सुरुवातीला त्या औषधाने उंदीर मरतात, पण त्या औषधाच्या अती वापरामुळे उंदीरांची पुढची पिढी त्या औषधाला प्रतिकार करण्याची जनुकीय शक्ती घेऊनच जन्माला येते. त्यामूळे उंदरांवर ताबा मिळवण्यासाठी शेवटी साप हेच एक नैसर्गिक साधन उरते. शिवाय साप हे उंदरांच्या थेट बिळात शिरुन त्याला मारु शकतात. सापांबद्दल अंधश्रद्धा आणि गैरसमजूती दुर करण्याचा एक प्रयत्न आहे. सर्पदंशाच्या 88 टक्के घटना ग्रामीण भागात होतात. यात बहुतेकजण शेतकरी करी असतात.**

**साप :** अज्ञानापोटी सापांबद्दल माणसाच्या मनात अंधश्रद्धा भय पसरले आहे.हे भय व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी व सापांचे महत्व पटवून देण्यासाठी केलेला हा एक प्रयत्न. तर चला सुरु करूया सर्प जगताची सैर आणि जाणून घेऊया सापांना एका वेगळ्या दृष्टीकोनातून. सापांच्या सु. २,५०० जाती असून भारतात ३४० जाती आढळतात. त्यापैकी फक्त ६९ जातींचे सापविषारी आहेत. महाराष्ट्रात सापांच्या सु. ५२ जाती असून त्यापैकी १२ जाती विषारी आहेत. **सापांची उत्क्रांती :** सापांचे अस्तित्व सुमारे १५ कोटी वर्षाआधी पासून असल्याचे जीवाश्म अभ्यासातून समोर आले आहे. साप जरी सरपटणारा प्राणी असला तरी, काही वर्षापूर्वी त्यांनाही पाली प्रमाणे पाय होते पण बिळातून वावरताना त्यांना पायांचा अडथळा होत असल्याने ते पायांचा वापर खूपच कमी करू लागले व कालांतराने त्यांचे पाय नाहीसे झाले. अजगर सापामध्ये पायांचे अवशेष आजही दिसुन येतात. सापांचे अस्तीत्व मानवाच्या आधीपासून असल्याने ७/१२ चे खरे हक्कदार साप आहेत असे म्हणने वावगे ठरणार नाही. म्हणून साप आपल्या घरात येतो असे म्हणण्यापेक्षा आपण सापांच्या घरावर अतिक्रमण करून राहतो अस म्हणणं योग्य ठरेल.

**सापांचे प्रकार आणि सापांचे महत्त्व**

**1) बिनविषारी :-** या प्रकारच्या सापांमध्ये बिलकुल विष नसतं. विषारी सापांपेक्षा बिनविषारी सापांची संख्या खूपच जास्त आहे.

**उदा:-** धामण,कवड्या,तस्कर, गवत्या, धूळनागीण इत्यादी.

**2) निमविषारी :-** हे साप विषारी असले तरी माणसास धोका नसतो. विषाची तीव्रता कमी असल्यामुळे याचं विष माणसासाठी जीवघेणे नाही. याच्या दंशामुळे चक्कर येणे, मळमळ, डोके दुखी इत्यादी लक्षणं दिसतात. **उदा :-** मांजऱ्या, रेती सर्प, हरणटोळ इत्यादी.



**3) विषारी :-** या सापाचा दंश धोकादायक असतो. याच्या दंशा मुळे वेळीच उपचार न झाल्यास जीव जाण्याची शक्यता असते.

**उदा :-** नाग, मण्यार, घोणस. फुरसे इत्यादी. नाग, मण्यार, घोणस

**सापांपासून होणारे फायदे :-**

1. साप उपद्रवी उंदरांवर व घुशीवर नियंत्रण ठेवतो.
2. सापांच्या विषाचा उपयोग औषधे बनवण्यासाठी केला जातो. उदा. कर्करोग, हृदयविकाराचा झटका, रक्तदाब, भूल, पेन किलर, इ.
3. काही साप पाण्यावरील डासांची अंडी खाऊन DENGUE, MALERIA इ.रोगांपासून आपले संरक्षण करतात.
4. जर विषारी साप चावला तर त्याच प्रकारच्या विषारी सापांपासून प्रतिविष तयार करावे लागते.
5. बरेचसे कीटक व अळ्या पिकांची नासाडी करतात. त्यांना खाण्याचे काम साप करतो व त्या किडे व अळ्यावर नियंत्रण ठेवतो.
6. काही जमीन पोखरणारे साप जसे की खापरखवल्या, मांडूळ, वाळा इत्यादी जमीन भुसभुशीत करतात जी शेती साठी अत्यंत उपयुक असते. **क्रमशः**

# वारकरी संप्रदायास आधुनिक रूपदाते संत!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**_घेतलेल्या शिष्यत्वाच्या परीक्षेत आबाजी उत्तीर्ण झाले. म्हणून गुरू माणिकबाबांनी त्यांना अनुग्रह दिला आणि गुरूपदेश केला. नंतर गुरूंनी त्यांचे नाव भगवान ठेवले. त्यांचे पुण्यस्मरण करून श्रीकृष्णदास निरंकारी- बापू यांनी लेखरूपाने लिहिलेली ही रोचक माहिती. संतश्रेष्ठ भगवानबाबांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन केले. भक्तिमार्ग, कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांचा त्रिवेणी समन्वय त्यांनी साधला होता. तो त्यांच्या कीर्तनातही दिसून येई.**

कीर्तनकार म्हणून त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली होती. आपल्या कीर्तनांतून ते जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी-परंपरा यांच्यावर प्रहार करीत. प्रबोधन कार्यासाठी त्यांनी मराठवाडा, विदर्भ, तेलंगाणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकातील काही भाग व पश्चिम महाराष्ट्रासह उभा महाराष्ट्र पिंजून काढला.

विठूनामाचा प्रचार करतानाच त्यांनी समता, बंधुता, एकता, मानवता यांसारख्या आधुनिक विचारांचा आयुष्यभर प्रचार केला. त्यामुळेच वारकरी संप्रदायाला आधुनिक रूप देणारे संत म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी वार्षिक नारळी सप्ताहाची स्थापना केली.

आबाजींचे पूर्वज हे लहानपणापासून नारायणगडाचे उपासक होते. तेथील महंत हे त्यांचे वंशपरंपरागत गुरू होते व तत्कालीन गादीवर माणिकबाबा होते. आबाजींचे आईवडील नेमाने माणिकबाबांच्या दर्शनासाठी नारायणगडावर येत. एकदा आईवडील त्यांना घेऊन विजयादशमीच्या दिवशी तेथे आले. आबाजींनी माणिकबाबांना "गुरूपदेश द्या" असे म्हटले. त्यावर अल्पवयात गुरूपदेश देता येत नाही असे माणिकबाबा म्हणाले. पण त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही. घेतलेल्या शिष्यत्वाच्या परीक्षेत आबाजी उत्तीर्ण झाले. म्हणून माणिकबाबांनी त्यांना अनुग्रह दिला आणि गुरूपदेश केला. नंतर गुरूजींनी त्यांचे नाव भगवान ठेवले. असे म्हटले जाते, की पंढरपुरला गेल्यानंतर तेथेच त्यांची भेट नारायणगड येथील माणिकबाबांशी झाली व ते सांप्रदायिक शिक्षणासाठी नारायणगडी गेले. माणिकबाबा हे त्यांचे गुरू होय. त्यानंतर भगवानबाबा पुढील शिक्षणासाठी आळंदीतील बंकट स्वामी यांच्याकडे गेले. त्यानंतर ते पुन्हा नारायणगडावर आले. त्यावेळी भगवानबाबांचे वय २१ वर्षे होते. त्यानंतर भगवानबाबा नारायणगडाचे महंत झाले व त्यांनी तेथे वारी, नारळी सप्ताह असे अनेक धार्मिक कार्यक्रम राबवले. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यांत सुपेघाट सावरगाव येथे श्रावण वद्य पंचमी शके १८१८ म्हणजेच दि.२९ जुलै १८९६ रोजी संतशिरोमणी भगवानबाबा यांचा जन्म झाला. बारशाच्यावेळी मुलाचे नाव आबा किंवा आबाजी ठेवण्यात आले. त्यामुळे भगवानबाबांचे पूर्ण नाव आबाजी तुबाजी सानप होते. ते कौतिकाबाई आणि तुबाजीराव यांचे पाचवे अपत्य होते. सावरगावात चौथीपर्यंत शाळा होती. तेव्हा



गुरुजींच्या सांगण्यावरुन पुढील शिक्षणासाठी त्यांना त्यांच्या मामाच्या गावी लोणी, ता.शिरूर, जि.बीड येथे पाठवले गेले. अधिक शिक्षणसोयी नसल्याने आबाजी पुन्हा गावाकडे परत आले. ग्रामीण भागात रीती रिवाजानुसार गुरेढोरे राखायला ते जात असत. आबाजीला शेती व गुरांची निगराणी राखायला फार आवडत असे. घरात धार्मिक वातावरण असल्यामुळे उपजतच त्यांना अध्यात्माची व विठ्ठलनामाची आवड निर्माण झाली. ते घरी शेतीकाम सांभाळून विठ्ठलभक्ती करत असत. त्यांनी पंढरपूर दिंडीत जाण्यास सुरुवात केली. दिघूळ येथील प्रख्यात वारकरी गितेबाबांसोबत ते प्रथम दिंडीस गेले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन झाले तर जीवनाचे कल्याण होते, अशी त्यांच्या परिवारात आणि आसपासच्या समाजात समजूत होती. त्यामुळे त्यांनी गीतेबाबा दिघुळकरांसोबत पंढरपूरची वारी केली. त्यासाठी ते वयाच्या ५-६व्या वर्षी घर सोडून पायी चालत गेले. पहिल्या वारीच्या शेवटीच तेथे पोहोचल्यावर त्यांनी संपूर्ण जीवन विठ्ठलचरणी अर्पण केले. त्यांनी गीतेबाबांनाच आध्यात्मिक गुरू मानले. पंढरपूरच्या वारीवरून गावी परतल्यावर आबाजी घरी परत गेले नाही. गावातील हनुमान मंदिरात जाऊन बसले. घरच्यांना ही बातमी कळताच ते मंदिरात आले. तेव्हा त्यांनी तुळशीमाळ घालण्याचा आग्रह केला. लहान आबाजींचे भगवंताविषयी असलेले प्रेम पाहून घरच्यांनी आग्रह स्वीकारला. तेव्हाच ते घरी परत आले.

अनेक वर्षे बाबांची कीर्तन कारणाने भ्रमंती सुरू असताना त्यांनी समाजाचे जवळून निरीक्षण केले, अभ्यास केला. समाजाचे विदारक चित्र पाहून त्यावर बाबांनी कीर्तनाद्वारे समाजप्रबोधन केले. समाजातील अनेक वाईट प्रथा व चालीरीती बंद करण्याचा प्रयत्न केला. अंधःकारातून प्रकाशाकडे जाणारा मार्ग बाबांनी सांगितला. इ.स. १९६५ च्या प्रारंभी भगवानबाबांची प्रकृती खालावत चालली होती. अनेक दिवसांपासून त्यांच्या प्रकृतीत चढ उतार होत होते, त्यांची प्रकृती आणखी खालावली व प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना पुणे जिल्ह्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे औषधपाण्याकरिता दाखल केले. संतश्रेष्ठ भगवानबाबा हृदयविकाराने आजारी असताना उपचार करण्यासाठी रुबी हॉल क्लिनिक इस्पितळातील डॉ.के. बी.ग्रँट व त्यांची टीम दाखल झाली. त्यांच्या विनंतीला मान देऊन नाथा मिसाळ हे ज्ञानेश्वरीचे पारायण करत असत. तेथेच दि.१८ जानेवारी १९६५ रोजी वयाच्या ६९व्या वर्षी समाधीस्थ होऊन जगाचा निरोप घेतला. तीन वेळा त्यांनी "पुंडलीक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्‌गुरू तुकाराम महाराज की जय, शांतिब्रह्म श्री एकनाथ महाराज की जय!" असा जयघोष करून आत्मा पांडुरंगचरणी विलीन केला व देह ठेवला.

# रंगीरंगलाश्रीरंग

आधुनिक केसरी

गणेश महाराज एक धार्मिकते बरोबर वैज्ञानिक दृष्टीकोन असणारे महाराज, त्यांचा शिष्य परिवार भरपूर , महाराजाचा आवाज गोड,मधुरवाणी, परखड



विचार मांडणारे किर्तनकार म्हणून ख्याती होती ......

विदर्भातील एका गावात आपल्या परिवारासह महाराज राहत ..... अन्न आणि स्वच्छता हे त्यांचे अत्यंत लाडके विषय! किर्तन,प्रवचन, भजन यातून अन्न आणि स्वच्छता याबाबत सर्वात जास्त मौलिक मार्गदर्शन करीत ....... विदर्भ , मराठवाडा, खानदेश या भागात त्यांना मानणार शिष्य परिवार अधिक होता .... रोज अन्नदान हे त्यांच्या मठाचे वैशिष्ट्य होते... महाराज आणि त्यांच्या पत्नी अन्नपूर्णा जातीने स्वयंपाक घरात आवर्जून लक्ष घालीत . भरपूर अन्नदान पण अन्नाचा एक कण वाया गेला नाही पाहिजे यावर जास्त भर देत........

अन्नपूर्णाबाईंना" माई" या नावानेच सर्व मंडळी ओळखत .... नावाप्रमाणेच सुगरण ,हाताला चव असणाऱ्या माई ! दिवसभरात किती लोक जेवणार त्यासाठी लागणारा शिधा किती लागेल? तो स्वतः महाराज कोठीघरातून काढून देत तर माई तो कसा पुरवायचा, कुठले पदार्थ तयार करता येतील, किती पदार्थ तयार होतील ह्याची काळजी घेत स्वतः करायच्या....... हाताखाली राबायला भरपूर जण असले तरी माई स्वतः दोन तीन पदार्थ करायच्या ...... त्या पदार्थांना अप्रतिम चव असायचीच शिवाय तो कधीच कमी पडायचा नाही.......

स्वयंपाक घरात स्वच्छता अत्यंत कसोशीने पाळली जायची . शुचिर्भूत होऊन,केस घट्ट बांधणाऱ्यालाच स्वयंपाकघरात प्रवेश असा माईंचा दंडक .... सर्वांना कामे वाटून द्यायच्या....काम करणाऱ्यावर त्या बारीक लक्ष ठेवून असायच्या .......



सौ. आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

पांडुरंग हे दोघांचे पण आराध्य दैवत! दर आषाढी, कार्तिकी एकादशीला पंढरपूरला त्यांच्या मठात आपल्या मोजक्याच "पाचशेच" शिष्यपरिवारासोबत मुक्कामाला असायचे ..... त्यांची दिंडी येताना ज्या गावात मुक्काम असायचा तिथं त्यांच्यातले सहा सात शिष्य थांबायचे बाकीची दिंडी पुढे मार्गस्थ व्हायची ... तो थांबलेला शिष्यगण मुक्कामाचे ठिकाण आणि जवळपासचा परिसर स्वच्छ करून मग दिंडीत सामील व्हायचे..... दिंडीच्या मुक्कामाचे ठिकाण वेगळे तसे थांबणारे शिष्य पण वेगळे असायचे .......

पौर्णिमेला परत जाताना देखील असेच असायचे मठ आणि परिसर स्वच्छ करून परतीला निघायचे .... अन्नदान हे श्रेष्ठदान ह्या उक्तीप्रमाणे आचरण करणारे दोघेपण. वारीत सहभागी झालेल्या स्वताच्या शिष्परिवाराबरोबर इतर मंडळींना पण जेवायला घालत ..... लागेल तेवढंच घ्या पण ताटात काहीच टाकायचे नाही हा नियम तंतोतंत पाळला जावा ह्यावर भर असायचा ....... चटणी ,कोशिंबीर, लोणचे, भाजी,आमटी, भात, पोळी आणि एक काहीतरी गोड पदार्थ असा रोजचा स्वयंपाक..... वारीकाळात रोज मठात हजार बाराशे माणूस जेवण करून जायचे ...... पण अन्नाचा एक कण पण वाया जायचा नाही हे त्यांचे वैशिष्ट्य....जेवण झाल्यावर आपलं ताट सेवेकऱ्याकडे नेऊन द्यायचे.... शक्यतो ताटात शिल्लक राहू नये हा मठाचा नियम तरी त्यात काही उरलंच तर सेवेकरी एका ठिकाणी ते गोळा करून मठाबाहेरच्या शोषखड्यात टाकायचे... त्यावर स्वयंपाक करताना राहिलेले साली, तुकडे, टरफले टाकायचे त्यावर मठातल्या देशी गाईंचे शेणमुत्र टाकले जायचे ..... त्यातून जे खत तयार व्हायचे तेच वापरून मठातल्याच एका कोपऱ्यात छोटेखानी तुळस आणि फुलांची बाग फुलवली होती ..... त्या बागेतल्या तुळशीचा आणि फुलांचा वापर मठातल्या मोठ्या सुबक विठ्ठल रखुमाईच्या मुर्त्यांना घातले जायचे तेव्हा दोन्ही मुर्त्या हासत आहेत असे वाटायचे......"रंगी रंगला श्रीरंग" हाच आदर्श सगळ्यांनी घेतला तर विठूरायाची पंढरी स्वच्छ आणि सुंदर होईल ह्यात शंकाच नाही..... रामकृष्ण हरी......

# फॅटी लिव्हर म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

सामान्य भाषेत यकृतामध्ये अतिरिक्त चरबी जमा होण्याला फॅटी लिव्हर म्हणतात. जर चरबीचे वजन यकृतापेक्षा ५ टक्के किंवा त्याहून अधिक असेल, तरीही त्याला फॅटी लिव्हर म्हणतात. फॅटी लिव्हरचे दोन प्रकार असतात.**फॅटी लिव्हरचे दोन टप्पे:** पहिले, जे अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे होते, त्याला अल्कोहोलिक फॅटी लिव्हर म्हणतात. दुसरे म्हणजे, नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर, नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हरमध्ये यकृताच्या आत चरबी असते पण त्यामुळे जास्त नुकसान होत नाही. परंतु नंतरच्या टप्प्यात समस्या येऊ शकतात.

**फॅटी लिव्हरचा सर्वाधिक धोका कोणाला आहे?**

ज्यांचे वजन जास्त आहे, त्यांना फॅटी लिव्हर होण्याची भीती असते. याशिवाय मधुमेह असलेल्या रुग्णांना, विशेषतः टाइप २ मधुमेहाच्या रुग्णांना फॅटी लिव्हरचा धोका असतो. हेपेटायटीस सी आणि उच्च कोलेस्टेरॉलमुळे देखील फॅटी लिव्हर होण्याची शक्यता वाढते. **फॅटी लिव्हरची लक्षण :** चरबीयुक्त यकृत हा एक सुप्त आजार आहे आणि यामध्ये कोणतीही स्पष्ट लक्षणे दिसत नाहीत.ही अवस्था असलेल्या व्यक्तीमधे सामान्यपणे थकवा येण्याची आणि पोटाच्या वरच्या उजव्या बाजूला थोडासा त्रास असण्याची शक्यता असते. बहुतेक लोकांमध्ये, हा आजार दर्शविणारी स्पष्ट लक्षणे दिसत नाहीत. जेव्हा चरबीयुक्त यकृत, सूज आणि क्षतीची चिन्हे दिसण्यास सुरुवात होते तेव्हाच या अवस्थेची लक्षणे दिसू शकतात.

# ट्रान्सजेंडर: आव्हाने अजूनही अगणित आहेत



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**ट्रान्सजेंडर अर्थात तृतीपंथी हा वर्ग देखील आपल्या समाजाचा एक आवश्यकच भाग.कायद्यासमोर समानतेचा अधिकार आणि कायद्याचे समान संरक्षण हे घटनेच्या कलम १४ आणि २१ नुसार हमी दिलेले आहे. परंतु आपला समाज त्यांच्याकडे एका वेगळ्या भावनेने बघतो. अनेक ट्रान्सजेंडर लोकांना कामाच्या ठिकाणी भेदभावाचा सामना करावा लागतो आणि सार्वजनिक हॉटेल किंवा इतर निवासी जागा शोधण्यात आणि आरोग्य सेवांमध्ये अनेक ठिकाणी त्यांना भेदभावाविरुद्ध कायदेशीर संरक्षण नाही. भारतीय संस्कृती आणि न्यायव्यवस्था तृतीय लिंगाला मान्यता देते. त्यांना हिजडा म्हणतात .**

भारतात , १५ एप्रिल २०१४ रोजी, सर्वोच्च न्यायालयाने तृतीय लिंग ओळखले, जे स्त्री किंवा पुरुष नाही, असे म्हटले की "तृतीय लिंग म्हणून मान्यता देणे ही सामाजिक किंवा वैद्यकीय समस्या नाही, परंतु मानवी हक्कांची समस्या आहे.

**ट्रान्सजेंडर व्यक्तींविरुद्ध भेदभाव**

लिंग हे पारंपारिकपणे बायनरी म्हणून समजले जात असल्याने, ट्रान्सजेंडर लोक जेव्हा समाजाने तयार केलेल्या लिंग ओळखीच्या कालातीत आणि अपरिवर्तनीय परंपरांसह स्वतःची ओळख करून देतात तेव्हा त्यांच्याशी भेदभाव केला जातो. शिस्त लावू नका. ट्रान्सजेंडर लोकांबद्दल वाटणारा विरोध, भावनिक तिरस्कार आणि राग समाजात ओळखले जाण्यासाठी त्यांच्या संघर्षाचा समावेश आहे. त्यांना द्वेषपूर्ण गुन्ह्यांचा आणि धर्मभ्रष्टाचा सामना करावा लागतो, त्यांच्या लिंग ओळख स्वीकारण्याबद्दल पूर्वग्रह आणि अस्वस्थता जाणवते जी आमच्या विश्वास प्रणालीला आव्हान देते. लिंग बायनरीशी अनुरूप नसल्यामुळे, समाज त्यांना लैंगिक विचलित म्हणून चुकीचा समजतो. त्यांना नोकरीचे अर्जदार म्हणून अविश्वसनीय अडथळ्यांचा सामना करावा लागतो आणि जेव्हा त्यांनी त्यांची ट्रान्सजेंडर ओळख उघड केली तेव्हा त्यांना काढून टाकण्यात आले, पदोन्नती नाकारण्यात आली किंवा त्रास दिला गेला. मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी उपेक्षितपणा, गरिबी आणि बेघरपणाकडे कारणीभूत ठरते, ज्यामुळे त्यांची शारीरिक हिंसा, लैंगिक शोषण आणि शोषणाची असुरक्षितता वाढते. या भीषण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी जे हतबल होतात, ते तस्करीसाठी यजमानांचे प्राथमिक लक्ष्य बनतात. जरी ट्रान्सजेंडर लैंगिक तस्करी हा समस्येचा सर्वात गंभीर भाग आहे, तरीही ट्रान्सजेंडर व्यक्तींना होणाऱ्या व्यापक शोषणाचा आणि भेदभावाचाच तो एक भाग आहे.

बहुतेक ट्रान्सजेंडर लोक आर्थिक वंचित आणि स्थिती निराशेतून जातात. हा अत्याचार त्यांना समाजापासून वेगळे करतो. या दुष्टचक्रातून मुक्त होण्याची गरज आहे .

ऐतिहासिकदृष्ट्या, ट्रान्सजेंडर्सना अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे आणि समाजाचा त्यांच्याबद्दलचा दृष्टीकोन देखील अनादराचा आहे. त्यांना त्यांच्याच घरातून हाकलून दिले जाते, त्यांचेच कुटुंबीय त्यांना सोडून जातात. त्यांच्या जन्माच्या क्षणापासून हा भेदभाव सुरू होतो. ते प्रेम, आदर आणि सन्मानापासून वंचित आहेत. त्यांना सामान्य लोकांपेक्षा वेगळ्या पद्धतीने वागवले जाते, तर आपल्याला हे समजून घेणे आवश्यक आहे की ते आश्चर्यकारकपणे



संतुलित मानव आहेत.

ट्रान्सजेंडर्सनी त्यांच्यावरील या भेदभावाला विरोध केला आहे आणि अनेक अडथळे दूर केले आहेत. ट्रान्स समुदायाने आरोग्य, शिक्षण आणि इतर क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. ट्रान्सजेंडर चळवळीत लक्षणीय प्रगती आणि गेल्या दशकात महत्त्वपूर्ण कायदेशीर विजय असूनही, त्यांच्याविरुद्धचा भेदभाव संपलेला नाही. त्यांच्यासोबत शारीरिक अत्याचाराच्या घटनाही मोठ्या प्रमाणात घडत आहेत.

जगभरातील अनेक संस्कृतींमध्ये लिंगाबद्दल वेगवेगळ्या समजुती आहेत. नेटिव्ह अमेरिकन संस्कृतीत, ज्या लोकांचे लिंग पुरुष किंवा स्त्री सारखे नाही त्यांना सामान्य मानव आणि देव यांच्यामध्ये स्थान दिले जाते. जुन्या हिंदू धर्मग्रंथांमध्ये हिजडा किंवा किन्नरांना दैवी मानले जाते आणि त्यांनी राजवाड्यांमध्ये आदरणीय सल्लागार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.

भारतीय शिक्षण पद्धतीचा एक दोष म्हणजे ती कौशल्य विकासाला प्रोत्साहन देत नाही. जसजसा वर्ग वाढत जातो तसतसे बरेच विद्यार्थी बाहेर पडतात. परिणामी समाजात निरुपयोगी वर्ग निर्माण होतो. बहुतेक ट्रान्स लोक या श्रेणीत येतात. कौशल्यावर आधारित शिक्षण ही दरी भरून काढण्यास मदत करू शकते. भारतात १४ वर्षांपर्यंतच्या प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. हा अधिकार ट्रान्स व्यक्तींनाही उपलब्ध आहे. ट्रान्स व्यक्तींना त्यांच्याबद्दल शाळांना संवेदनशील करून, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांच्या सहकार्याने आणि विद्यापीठ अनुदान आयोग आणि केंद्रीय आणि राज्य शिक्षण मंडळांद्वारे ट्रान्सजेंडर अधिकारांना प्रोत्साहन देऊन शिक्षित केले जाऊ शकते. विविध देश आणि कार्यकर्ता गटांनी दर्जेदार शिक्षण देण्यासाठी उद्दिष्टे निश्चित केली आहेत. केरळमधील सहज इंटरनॅशनल स्कूल, २०१४मध्ये ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याची परवानगी देणारे दिल्ली विद्यापीठ आणि पश्चिम बंगालमधील कृष्णनगर महिला महाविद्यालयाच्या पहिल्या ट्रान्सजेंडर प्राचार्या मानबी बंदोपाध्याय यासारखे प्रयत्न दाखवतात की भारत हळूहळू पण निश्चितपणे बदलत आहे. अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठे आता विद्यार्थ्यांची ओळख म्हणून ट्रान्सजेंडरचा पर्याय देत आहेत. ट्रान्स व्यक्तींना आरोग्याच्या बाबतीत अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांच्यासोबत गैरवर्तन आणि भेदभावाच्या अनेक घटना घडत असतात. उपचार नाकारणे ही सर्वात मोठी समस्या आहे. त्यांचा छळ तर होतोच, पण कधी कधी त्यांच्यावर शारीरिक अत्याचारही केला जातो. त्यांच्यासाठी योग्य आरोग्यसेवा मिळण्यात हा मोठा अडथळा आहे. रूग्णालयातील कर्मचारी आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना देखील ट्रान्सजेंडर्सशी कसे वागावे हे माहित नाही. यामुळे त्यांना एचआयव्ही आणि इतर लैंगिक संक्रमित रोगांचा धोका वाढतो. परिवर्तनाच्या उपचारांमध्ये भेदभाव देखील सामान्य आहे. एखाद्याच्या शस्त्रक्रियेच्या स्थितीच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाऊ नये. अशी वागणूक थांबवण्याची जबाबदारी प्रत्येक वैद्यकीय व्यावसायिकाची असली पाहिजे. ट्रान्सजेंडरच्या नोकरीचा प्रश्न तिच्या कायदेशीर ओळखीशी जोडलेला आहे. मतदानाचा हक्क, शिक्षणाचा हक्क, मालमत्तेचा अधिकार, आरोग्य आणि सामाजिक सेवा इत्यादी मिळविण्यासाठी ओळखपत्रे आवश्यक आहेत. नोकरीतील भेदभाव, कामाच्या ठिकाणी छळ, वेतनातील असमानता, कायदेशीर संसाधनांचा अभाव आणि विविध कागदपत्रांची अनुपलब्धता हे ट्रान्सजेंडर लोकसंख्येच्या रोजगारातील प्रमुख अडथळे आहेत. त्यामुळे कामाच्या ठिकाणी होणारा छळ रोखण्याबरोबरच तेथे उपलब्ध असलेल्या सुविधांवर समान अधिकारांनाही प्रोत्साहन दिले पाहिजे जेणेकरून या लोकांनाही उत्पादनक्षम आणि निरोगी जीवन जगता येईल. भारतातील जातिभेद हा अजूनही मानवाधिकार कार्यकर्त्यांसाठी चिंतेचा विषय आहे. कोणत्याही समाजाला लागलेल्या 'कलंक'मुळे त्यांना कमी संधी तर मिळतातच, पण स्वीकृतीही त्यांना खूप अवघड जाते. याचा परिणाम असा होतो की ट्रान्सजेंडर्सना योग्य शिक्षण मिळत नाही. अशा स्थितीत त्यांच्यासाठी वेश्याव्यवसाय हाच एकमेव मार्ग उरतो. त्यामुळे त्यांना लैंगिक आजार होण्याचा धोका वाढतो. एकूणच, ट्रान्स कम्युनिटी आजही समाजाच्या मार्जिनवर उभी आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे मोठे आव्हान आहे.

**भारतात ट्रान्सजेंडर अधिकार**

ट्रान्सजेंडर लोक अशा व्यक्ती आहेत ज्यांच्या स्टिरियोटाइप आणि अस्तित्वात फक्त दोन लिंग आहेत, ते पुरुष आणि मादी आहेत; त्यांचे स्वरूप, वैयक्तिक वैशिष्ट्ये आणि वर्तन भिन्न आहेत. इतर लिंगांपेक्षा वेगळे असल्याने, ट्रान्सजेंडर लोक सामाजिक दडपशाहीला बळी पडतात कारण समाज त्यांची लिंग ओळख स्वीकारतो आणि त्यांच्यावर शारीरिक हिंसाचार होतो. शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, बेघरपणा, आरोग्य सुविधांचा अभाव, नैराश्य, दारूचा गैरवापर आणि आयुष्यभर भेदभाव या मुख्य समस्यांना ते ग्रासले आहेत. त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, भारतीय संविधानाने त्यांना काही अधिकार प्रदान केले आहेत आणि सर्वोच्च न्यायालयाने त्यांना "तृतीय लिंग" म्हणून ओळखण्याचा अधिकार दिला आहे आणि त्यांना काही कल्याणकारी उपाय देखील प्रदान केले आहेत.

# लोकशाहीचे खांब एकाच बाजूने झुकले



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून भारतीय लोकशाही ला खुप मोठा इतिहास सुध्दा आहे. भारतीय लोकशाही ही चार स्तंभावर उभी आहे. आणि या चार स्तंभामुळे करोडो जनता लोकशाहीच्या छताखाली सुरक्षित असते. ते चार स्तंभ म्हणजे सर्वसामान्य जनतेचा आवाज असत. चारही स्तंभाला विषेश स्वातंत्र्य दिले आहे. आणि याच मुळे प्रत्येक जन आपापले काम निष्पक्ष आणि निडरपणे करू शकतात. परंतु आजची परिस्थिती बघितली तर लोकशाहीचे चारही खांब झुकलेले आहेत. आणि ते एकाच बाजुने झुकल्याने लोकशाही पुर्णपणे धोक्यात आलेली आहे.**

लोकशाहीमध्ये कोणत्याही एका पक्षाचे, एका नेत्याचे वर्चस्व निर्माण होऊ नये अशी तरतूद असताना ही आज एकाचेच वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आणि हीच बाब लोकशाही साठी सर्वात घातक आहे. लोकशाहीचे खांब एकाच बाजूने झुकले तर त्या देशातील संविधान फक्त नामधारी होते याची जाणीव लोकांना असणे आवश्यक आहे. लोकशाही मध्ये विरोधी पक्ष हा मजबूत पाहिजे असतो परंतु आज विरोधी पक्षच शिल्लक राहीलेला दिसत नाही. जेथे विरोधी पक्षच मजबूत नसेल तेथे लोकशाही आहे असे म्हणणे म्हणजे फक्त स्वतः च स्वतः ची पाठ थोपटणे होय. लोकशाही मध्ये सर्वात महत्वाचा खांब असतो तो म्हणजे लोकसभा/विधानसभा. लोकसभा किंवा विधानसभा मध्ये जनता आपले प्रतिनिधी प्रत्यक्ष निवडून देते. निवडून दिलेला प्रतिनिधी वा चारही खांबा अंतर्गत येणारे सर्व घटक हे जनसेवक असतात हि बाब आज जनताच विसरून चालली आहे. जे लोक प्रतिनिधी आपण निवडून देतो त्या प्रतिनिधींनी जनतेची जसे शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि महागाई संदर्भातील कामे करावी व समाजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, आणि न्याय प्रस्तापित करावा हीच प्रमुख कार्ये जनप्रतिनिधींची आहेत. आता आपण समाजाचा विचार केला तर शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि महागाई वर बोलणारे कोणीच राहीले नाही. सरकार तर बोलत नाही पण विरोधी पक्ष किंवा जे स्वतःला जनतेचे नेते समजतात ते कोणीच बोलत नाही आहेत. प्रस्थापित सरकारला तर लोकशाही आणि लोकशाही च्या माध्यमातून संविधानच मान्य नाही आहे. म्हणून प्रस्थापित सरकार शिक्षण, आरोग्य, रोजगार महागाई यावर न बोलता भलतेच जे विषय जनतेच्या फायद्याचे नाहीत आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय याला तडा जाणारे मुद्दे समोर केले जातात आणि स्वतः ला विरोधी किंवा जनतेचे नेते समजले जाणारे त्यांना उत्तरे देत बसतात. जसे सरकार पुरस्कृत लोक धर्म, रंग, इतिहास या बद्दल चुकीचे विधान करतात आणि विरोधी पक्ष, नेते, त्यावर प्रतिक्रिया देत बसतात. थोडक्यात काय तर जनहीतावर बोलण्या ऐवजी निष्फळ विषयावर चर्चा करून मुळ विषयापासून जनतेला दुर नेत आहेत. म्हणून सत्ताधारी असो वा विरोधक अजेंडा मात्र एकच राबवत आहेत. वेगवेगळ्या शक्तीचा वापर करून अनेक छोट्या मोठ्या पक्षांना नेत्यांना कमळाकडे आकर्षित केले जात आहे. अनेक नेते तिकडे जाऊन मला स्वतःला काही मिळेल म्हणून हातमिळवणी करत आहेत. मग जनतेचा विश्वास, विचारधारा सर्व पायदळी तुडवल्या जात आहे. जे लोक जनतेचे विचार आणि विचारधारा पायदळी तुडवतात ते नेते ते लोक लोकशाही कशाच्या आधारावर टिकवतील हा खूप मोठा प्रश्न आहे. प्रत्येक नेत्याचे काही भक्त सुद्धां निर्माण झालेले आहेत. आमचा नेता जे काही करतो ते बरोबरच आहे ओरडून ओरडून सांगणारे भक्त लोक त्यांच्या नेत्यांबद्दल शब्दही बोलु देत नाहीत. जर जनतेला नेत्याबद्दल बोलतच येत नसेल तर लोकशाही मजबूत आहे असे म्हणजे मुर्खपणाचे आहे. नेत्यांना डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या लोकांनी एकच विचार करावा आपण ज्याला नेता माणतो तो काहीच काम करत नाही. तरी त्याच्या कडे अनेक शहरात मोठमोठे बंगले असतात. दरवर्षी नवनवीन गाड्या, नेत्यांचे मुलं शाळेतच असतात पण कमाई करोडो रुपयांची, निवडणुकी मध्ये करोडो रुपये खर्च होतात तो पैसा येतो तरी कुठुन याचआ विचार करणे आवश्यक आहे. कार्यकर्ते पक्षाचे एकनिष्ठ काम करतात, मेहनत करून पोट भरतात तरीही साध घर बांधले जात नाही, नेत्याचे मुल विदेशात शिकायला जातात आणि कार्यकर्त्यांच्या मुलांना रिक्षाने जायला पैसे नसतात. राजकीय नेत्यांकडे एवढा पैसा येतोच कसा? लोकशाही मध्ये जनसेवक मालामाल आणि जनतेचे हाल असतील तर त्याला लोकशाही म्हणायचे का प्रश्न आहे. जागृत नागरिकांनी नेत्यांना एकच प्रश्न विचारायला पाहिजे शिक्षण सुरू असताना तुमचे मुलं करोडो रूपये कमवतात तर ने नेमकं काम तरी काय करतात. तेच काम करून कार्यकर्ते किमान चांगल्या पद्धतीने उदरनिर्वाह तरी करतील.



दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाचे पण अति महत्वाचे समजले जाणाऱ्या खांबाला तर सरकारच निपक्ष काम करू देत नाही याचे अनेक उदाहरणे आहेत. न्यायालयातील न्यायधिशांना बरोबर काम करू दिले जात नाही, एक्झिक्युटिव्ह बॉडी ला स्वतंत्र पणे काम दिले जात नाही. म्हणून तर आज लहान लेकराला सुद्धां ED चे नाव माहिती झाले आणि ED ची धाड सरकारमध्ये असलेल्या नेत्यांच्या घरावर पडत नाही अशा प्रकारचा आवाज जनतेमधुनच येत आहे. जनतेला याही पुढचे माहिती आहे ज्यांच्या वर ED धाड पडली आहे, किंवा पडणार आहे असे जर कमळाकडे गेले तर ED पासून संरक्षण मिळते. हा आवाज सर्व सामान्य माणसाचा आहे. आणि हाच आवाज सरकार पर्यंत पोहचवण्याची जबाबदारी असते ती म्हणजे मिडियाची. परंतु आज आपण बघितले तर काही प्रिंट मिडिया चांगले काम करण्याचा प्रयत्न करतात परंतु त्यांना मोठ होऊ दिले जात नाही. आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया बघितला तर जनतेचा आवाज सरकार पर्यंत पोहचवण्याची नैतिक जबाबदारी असताना सरकारचा आवाज जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम इलेक्ट्रॉनिक मिडिया करत आहे. कोणताही मिडिया असो लोकशाही मध्ये त्याची भुमिका विरोधी पक्षाची असती. परंतु आजचा मिडिया सत्ताधारी असल्याचे दिसून येत आहे. सरकार चा अजेंडा इलेक्ट्रॉनिक मिडिया राबवत आहे आणि जनतेचा आवाज जनतेमध्येच दाबल्या जात आहे. मिडिया ला सुद्धां आज धर्म आणि रंग अधिक प्रिय वाटत आहे. आज इलेक्ट्रॉनिक मिडिया वर चर्चा बघितली तर हसु येते, वादविवाद करणाऱ्या लोकांच्या बुद्धीची किव येते आणि विशेष म्हणजे सर्वांच्या समोर लोकशाही तुडवली जात असताना जनतासुद्धा फक्त बघ्यांची भुमिका घेत आहेत हेच तर लोकशाही ला मारक आहे. लोकशाही धोक्यात म्हणजे संविधान धोक्यात आहे. आज लोकशाही व संविधान धोक्यात असताना, जनता धोक्यात असताना संविधानाला ज्यांनी डोक्यावर घेऊन नाचले, संविधानामुळे आम्ही बोलु शकतो, लिहु शकतो, संविधानामुळे आम्हाला हक्क आणि अधिकार मिळाले असा डोंबारा करणारे नेते लोकशाहीची खांब ज्यांनी झुकवले त्यांच्या कडे स्वहीतासाठी जात आहेत. परंतु लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी मात्र कोणी ही एकत्र येत नाही हि खंत आहे. आजही देशातील सुशिक्षित लोकांना संविधाना विषयी माहिती माहिती नाही, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले एवढेच माहिती आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचे नाव घेऊन नेते बनले आणि हेच लोक आज विरोधी शक्तीसोबत जाऊन उभे राहत आहेत. देशात लोकशाही ची हत्या होत असताना संविधानाचा उदोउदो करणारे आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन राजकारण करणारे नेते प्रामुख्याने जबाबदार आहेत. कारण एक तर जनतेच्या संविधानाच्या मुद्यावर हे लोक एकत्र येत नाहीत. दूसरी गोष्ट संविधानाची अंमलबजावणी होऊन त्रेहत्तर वर्ष पुर्ण होत आहेत तरीही संविधान अजून जनतेला कळाले नाही याला जबाबदार कोण? डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचे नाव घ्यायचे राजकारणामध्ये राजकीय पोळी भाजून करोडो रुपयांची माया जमा करायची हेच आज पर्यंत केल्या गेले परंतू कोणत्याही नेत्याने संविधान साक्षर मोहीम राबवली नाही, सरकारला संविधाना विषयी जनजागृती करण्याच्या सूचना केल्या नाहीत म्हणून संविधानाचा अमृतमहोत्सव जवळ येत आहे तरही लोकांना संविधान माहिती नसेल तर यापेक्षा मोठी शोकांतिका कोणती असेल. लोकशाहीचे चारही स्तंभ एका शक्तीकडे झुकत असताना लोकशाही नांदत आहे असे म्हणणे म्हणजे पाय बांधून पळण्यासारखे आहे. लोकशाहीचे खांब एका बाजूने झुकत असतात स्वतः ला पुरोगामी, आंबेडकरवादी आणि संविधानाचे अभ्यासक समजणारे लोकच जर एका शक्तीच्या, व्यक्तीच्या पक्षाच्या प्रभावाखाली येत असतील तर त्या देशातील संविधानीक हक्क अधिकार संपुष्टात येऊन हुकुमशाही मध्ये रुपांतर होण्यास वेळ लागणार नाही म्हणून सर्वानी एकत्र येऊन समाजाला लोकशाही व संविधाना विषयी जागृत करणे आवश्यक आहे.

# नवकवींसाठी काव्य लेखनाची गुरुकिल्ली



जयेश महादेव

आधुनिक केसरी


**जुन्या काळातल्या शालेय कविता आपल्या अजुनही लक्षात आहेत कारण त्या आपण ताला सुरात बोलायचो. त्या कवितांना स्वतःची लय, ताल आसायचा. म्हणजेच त्या कोणत्या ना कोणत्या वृत्तात असायच्या, पण अलिकडे अशा कविता खुप कमी लिहील्या जातात. कविता लिहीणाऱ्याला जर वृत्त, अलंकार, मात्रा या गोष्टींचे ज्ञान असेल तर नक्कीच वृत्तबद्ध कविता लिहीली जाईल.**

वृत्तबद्ध कविता ते गझल (तंत्र आणि मंत्र) हे डोंबिवलीचे प्रख्यात कवी विजय जोशी यांचे पुस्तक अलिकडेच प्रकाशित झाले आहे. या पुस्तकात कवी विजय जोशी म्हणजेच विजो यांनी वृत्तबद्ध कविता म्हणजे काय? तिथपासून ते गझल कशी लिहावी? याचे समग्र मार्गदर्शन केले आहे. विजय जोशी हे उत्कृष्ट कवी, गझलकार, समिक्षक आहेतच शिवाय ते 'काव्यगुरू' या उपाधीने सन्मानीत आहेत. वृत्तबद्ध कविता, गझल आणि मालवणी भाषेतील कविता अशा विविध प्रकारात ते काव्यलेखन करतात. त्यांचे चार कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत तर अजून चार प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. ते अनेक सन्मान आणि पुरस्कारांनी सन्मानीत आहेत. वृत्त आणि गझल मार्गदर्शन कार्यशाळेचे ते महाराष्ट्रभर आयोजन करत असतात व त्यातून वृत्तबद्ध कविता आणि गझल या विषयी मार्गदर्शन करत असतात.

काव्यलेखनासाठी फक्त प्रतिभेची जोड असून चालत नाही. त्यासाठी वृत्त,अलंकार,मात्रा यांचा अभ्यासही महत्वाचा असतो. कविता लिहिण्याच्या या तांत्रिक गोष्टींची जर माहिती झाली तर प्रतिभेला अजून झळाळी प्राप्त होते.

नवकवींसाठी हे केवळ पुस्तक नसून हा ग्रंथच आहे.

कवितेलाही व्याकरण असते ते शिकवण्याचे काम या ग्रंथाच्या माध्यमातून होणार आहे. कविता लेखन कसे करावे, वृत्तबद्ध कविता म्हणजे काय, मात्रावृत म्हणजे काय एवढेच नव्हेतर मात्रा कशा मोजाव्यात याचे समग्र ज्ञान या ग्रंथातून होते. कविता लेखन ते गझल लेखना पर्यंतचा प्रवास कसा करावा हे या ग्रंथातून शिकता येईल. मुक्तछंद




कवितेलाही एक लय असते ही लय कशी जपावी हे सुध्दा विजो आपल्याला समजावून सांगतात. कवितेची प्रत्येक गोष्ट ईथे आपल्याला अभ्यासायला मिळते. कविता म्हणजे काय? प्राथमीक अवस्थेत आपण ती कशी लिहीतो इथपासून एक परिपूर्ण कविता कशी हवी याचे विस्तृत ज्ञान आपल्याला मिळते. एवढच नाही तर या सगळ्या गोष्टींचा अभ्यास आणि सरावही ते आपल्याकडून करून घेतात.

सोशल मिडीयाच्या या युगात अनेकजण,अनेकजणी लिहीते झाले आहेत. ही खुपच आशादायी गोष्ट आहे पण आपण काहीतरी लिहून कधी एकदा ते सोशल मिडीयावर पोस्ट करतो असे आपल्याला झालेले असते आणि नंतर लाईक्स आणि कंमेटचा खेळ बघत बसतो. अशामुळे आपल्यात असेलेली प्रतिभा कालांतराने लोप पावण्याचीच जास्त शक्यता असते पण या प्रतिभेला जर विजोंच्या या पुस्तकाची जोड मिळाली तर नक्कीच नवकवींच्या प्रतिभेला चारचाँद लागल्या शिवाय रहाणार नाहीत.

संपूर्ण पुस्तकात जिथे जिथे उदाहरणा दाखल कविता देणे आवश्यक आहे तिथे तिथे विजो यांनी स्वतःच्याच कविता वापरल्या आहेत हे विशेष आहे. शाळेत असताना मात्रा, वृत्त, अलंकार या गोष्टी खूप क्लिष्ट वाटायच्या पण या पुस्तकरुपी ग्रंथाच्या माध्यमातून विजो यांनी त्या अतिशय सोप्या आणि सहज भाषेत आपल्याला समजतील आणि प्रत्यक्ष कविता लिहीताना या सर्व गोष्टींचा वापर कसा करायचा हे उदाहरणा सहीत सांगितले आहे. गझल लिहीणे ही एका कवीसाठी खुप मोठी गोष्ट असते. गझलेचा एक आकृतीबंध असतो काही मापदंड असतात त्या सांभाळून गझल लिहावी लागते पण विजो यांनी हे सर्व सांभाळत सहज सोपी आणि सर्व मापदंडात बसणारी गझल कशी लिहियची हे मुद्देसूद सांगीतले आहे. वृत्तबद्ध कविता ते गझल (तंत्र आणि मंत्र) हे पुस्तक भविष्यात अनेक पुस्कारांचे मानकरी होईल आणि भविष्यात पाठ्यपुस्तकीय अभ्यासक्रमात येईल याविषयी खात्री वाटते. नवोदिन कवींसाठी हे पुस्तक म्हणजे मार्गदर्शक आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून भविष्यात आपल्याला अनेक कवी, गझलकार मिळणार आहेत. चला तर मग कवी विजय जोशी यांच्या प्रेरणेने आपण सगळे मिळून कवितेचा अभ्यास करूया आणि आपल्यातील प्रतिभेला अजून प्रगल्भ करूया. **पुस्तकाचे नावः वृत्तबद्ध कविता ते गझल (तंत्र आणि मंत्र)**

**लेखक कवीः**

**विजय जोशी - 9892752242**



# सुंदर जीवन

आधुनिक केसरी

परमेश्वराने आपल्याला मानवी जन्म देऊन एक सुंदर जीवन दिले आहे. त्या परमेश्वराचे आभार आपल्याला सतत मानावेच लागतात. मानवी जीवन ही आपल्याला मिळालेली अमुल्य देणगी आहे. पण जीवन जगायचे कसे हे शिकण्यातच आपले जीवन संपून जाते. कोणी सांगतो असं जगावं, कोणी सांगतो तसं जगावं...... मित्रांनो हे जीवन आपलं आहे, ते कसं जगावं हे कोण ठरवणार..? आपणच ना..!! आपल्यावर होणारे संस्कार , शिक्षण, आजुबाजूची सामाजिक परीस्थिती यावरून ते आपणच ठरवत असतो. या सुंदर जीवनात अनेक समस्या असतात. या समस्या निर्मुलन केल्यावर जो आनंद मिळतो तो विश्वासात्मक असतो. जीवनात येणाऱ्या चांगल्या वाईट प्रसंगांचा सामना करून जो आनंद आपण मिळवण्याचा सतत प्रयत्न करतो तेच तर जीवन ना..!

**जयेश अ. माधव**

# रात्रीनंतर सकाळ होतेच....



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**अंधारातून मार्ग काढला की प्रकाश दिसतोच मात्र हीच सकाळ आणि प्रकाश पाहण्यासाठी आपल्याकडे हवा तो संयम आणि स्वतःच्या क्षमतेवर असलेला विश्वास. जर स्वतःच्या क्षमतेवर विश्वास असेल आणि कितीही कठीण काळ आला तरी संयम सोडला नाही तर अपयशाची साखळी तोडून माणूस यशाची शिखरे गाठतोच. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भारताचा माजी कर्णधार आणि धडाकेबाज फलंदाज विराट कोहली.**

गेली तीन वर्ष विराट कोहली हा अपयशाच्या गर्तेत सापडला होता. धावांची रास उभारणारी विराट कोहलीची बाब त्याच्यावर रुसली होती.

शतकाचे इमले उभारणाऱ्या विराटला मागील तीन वर्षात एकही शतक झळकावता आले नाही त्यामुळे त्याच्यावर टीका होऊ लागली. काही महाभागांनी तर त्याला संघाच्या बाहेर ठेवण्याची मागणी केली. स्वतःला क्रिकेटचे तज्ज्ञ म्हणवून घेणारे देखील विराटवर टीका करू लागले. मीडियात देखील विराटवर हल्ला होऊ लागला. विराटचा हरवलेला फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय ठरला होता. विराट मात्र टिकाकरांकडे दुर्लक्ष करून आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करत होता. टिकाकरांच्या टीकेला उत्तर देण्यात त्याने वेळ घालवला नाही तो नेहमी म्हणत असत की मला फक्त एका मोठ्या खेळीची गरज आहे. ती जर आली की मी पुन्हा फॉर्मात येईल कारण त्याचा स्वतःचा क्षमतेवर विश्वास होता. त्याला हवी असलेली मोठी खेळी टी २० च्या विश्वचषक स्पर्धेत आला या स्पर्धेत त्याने एक शतक झळकावले आणि भारताला जुना विराट सापडला. विराट पुन्हा फॉर्मात आला. द किंग इज बॅक....असाच इशारा त्याने या खेळीने जगाला दिला. टी २० विश्वचषकात पाकिस्तान विरुद्धच्या सामन्यात त्याने अविश्वसनीय खेळी करून भारताला विजय मिळवून दिला. तेथून मग त्याने मागे वळून पाहिले नाही. नुकत्याच झालेल्या श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत आपल्या तडाखेबंद खेळीने त्याने भारताला एकहाती विजय मिळवून देताना अनेक विक्रमांना गवसणी घातली. या मालिकेत त्याने दोन तडाखेबंद शतक झळकावताना एकदिवसीय सामन्यात ४६ तर एकुणात ७४ शतके झळकवण्याचा पराक्रम केला असा पराक्रम करणारा सचिन नंतरचा तो दुसराच खेळाडू आहे. सध्या खेळत असणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. सध्याची कामगिरी पाहता तो लवकरच विक्रमविर सचिन तेंडुलकर यांचा १०० शतकांचा विक्रम लवकरच मोडेल यात शंका नाही. मागील तीन वर्षाचे अपयश मागे टाकून तो पुन्हा आपल्या जुन्या अवतारात परतला आहे हे भारतासाठी शुभचिन्ह आहे. विराट पुन्हा फॉर्मात आल्याने य वर्षी तो धावांचा रतीब घालणार यात शंका नाही. यावर्षी भारत अनेक मोठ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे या मोठ्या स्पर्धेत विराटचा फॉर्म भारताला विजय मिळवून देईन. यावर्षी एकदिवसीय सामन्यांच्या विश्वचषक देखील आहे. जर विराटचा हा फॉर्म असाच राहिला आणि त्याला संघातील इतर खेळाडूंनी साथ दिली तर यावेळी भारत २०११ ची पुनरावृत्ती करेल यात शंका नाही. विराट अजूनही तरुण आहे त्याचा फॉर्म परत आला आहे आणि त्याच्या फिटनेसवर तर शंकाच नाही संघातील सर्वाधिक फिट खेळाडू हा विराटच आहे त्यामुळे तो आणखी पाच सहा वर्ष सहज खेळू शकतो या दरम्यान तो सचिनचा १०० शतकांचा विक्रम सहज मोडू शकतो. सचिनचा विक्रम जर कोणी मोडू शकेल तर तो फक्त विराटच आहे कारण आज त्याच्या नावे ७४ शतकांची नोंद आहे. सध्या खेळणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. त्यामुळे सचिनचा विक्रम विराट कोहलीच मोडेल यात शंका नाही.




# विकृतीचे स्वीकृतीमध्ये परिवर्तन होण्यासाठी मानवी जन्म



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मानव हा सृष्टीच्या रचनेतील सगळ्यात सक्षम चाणक्ष, हुशार, बुद्धीमान प्राणी . निसर्गातील इतर प्राणी व आप्तस्वकीय मानवी समुह यांच्या सोबत मानवाच आचरण हे गुणदोषानुसार ठरत. मुळात आपल्या मध्ये असणारी प्रचंड विकृती हि हाळुहाळु नष्ट करत योग्य पद्धतीने स्वतःला स्वीकृती मिळवत आपल्या मध्ये असणारे सर्व दुर्गुण अहितकारक बाबी संपुष्टात आणत चांगल्या सवयी सद्गुण अंगिकार करत आपलं जीवन लोककल्याणासाठी समर्पित करत आपल्याला स्वीकृती मिळवुन देण्यासाठी आहे. .शरिर हे अनेक प्रकारच्या गुणदोषाचे भांडार आहे. जशी वेळ येईल तसे एक एक गुण दोष प्रकट होत असतात.जीवन मार्गावर वाटचाल करत असताना अनेक वेगवेगळ्या प्रसंगांना सामोरं जावं लागतं.**

प्रसंगांनुसार जरी गुण दोष विशाल रूप धारण करत असले तरी विकृतीचे स्वीकृती मध्ये परिवर्तन होण्यासाठी मानवी जन्म आहे .पण मुळात हिच बाबा आपल्या लक्षात येत नाही .आणि त्यामुळे आपला प्रवास हा विकृती ते विकृती असाच आयुष्भर राहतो .त्या मध्ये बदल परिवर्तन होत नाही.जीवनातील खरी गरज असते ती विकृती ते स्वीकृती या मार्गावरून प्रवास होण्याची .पण शक्यतो असं होतं नाही .महणुन विकृती ते स्वीकृती हा प्रवास यशस्वी रित्या पुर्ण करण्यासाठी हा मानवी देह हेच आपल्याला उमजत नाही हे जीवाच दुर्भाग्य आहे. मिळालेला देह सत्कारणी लावत आणि सध्या काय, उद्दीष्ट काय, धेय्य काय आहे हे समजुन त्या दिशेने योग्य मार्गक्रमण करत आपल्याला मिळालेला



मानवी देह आपल्याला नेमका कशासाठी प्राप्त झाला आहे हे समजुनच आचरण करण गरजेचे आहे. एकदा का आपल्याला जन्मच साध्य कारण समजलं कि मग उर्वरित कार्य सोपं जातं . मानवी जीवनात अनेक घटना घडामोडी घडत असतात आणि याच दरम्यान प्रत्येक व्यक्ती मध्ये असणारे वेगवेगळे रूप आपल्याला पाहायला सुद्धा मिळत . जन्मताच कोणीही चांगला वाईट नसतो .पण एकदा परिणाम समजायला लागले कि मग खरं आयुष्य तिथुनच पुढे चालू होतं . आणि याच दरम्यान आपल्याला कडुन अनेक चांगल्या वाईट घटना घडत असतात. त्या मध्ये संगत वातावरण , वेळ प्रसंग याचा मोठा वाटा असला तरी मुळात आपण घेतलेला जन्म सार्थकी लावायचा असेल तर सृष्टी वर उपलब्ध ज्ञानाचा अंवलब करत अनुभुती घेत आपल्याला आपल्या जीवनाचा उद्देश बदलता आला पाहिजे आणि सर्व दोष नष्ट करून जीवला देवत्व प्राप्त करून देता आलं पाहिजे आणि हे फार कठिण काम नक्कीच नाही.हे अगदी सहजासहजी शक्य आहे. फक्त आपल्याला आपल्या जीवनाचा हेतू समजला पाहिजे आणि मुळ हेतु हाच आहे कि अनेक विकृती नष्ट करून जीवाला स्वीकृती मिळवुन द्या. महणजे जन्म सार्थकी लागला म्हणून समजा आणि विकृती ते स्वीकृती हा प्रवास यशस्वी झाला तरच आपण घेतलेल्या मानवी जन्माचे हित साध्य झाले.

# मोदी सरकार आर्थिक विषमता रोखण्यात सपशेल फेल

## अतुल लोंढे : देशातील आर्थिक, सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठीच काँग्रेसची 'भारत जोडो यात्रा'

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे सरकार मागील ९ वर्षात सर्वच आघाड्यांवर फेल ठरले आहे. मोदी सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांची मोठी किंमत देशातील गरिब जनतेला मोजावी लागत असून श्रीमंत अधिक श्रीमंत होत असल्याचे 'ऑक्सफॅम' संस्थेच्या अहवालाने स्पष्ट झाले आहे. देशातील ४० टक्के संपत्ती केवळ १ टक्के गर्भश्रीमंतांकडे तर ५० टक्के जनतेकडे केवळ ३ टक्के संपत्ती आहे. ही आकडेवारीच मोदी सरकार देशातील आर्थिक विषमता रोखण्यात अपयशी झाल्याचे सिद्ध करत आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.

यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे पुढे म्हणाले की, मोदी सरकारने सामान्य जनतेच्या हिताची धोरणे न राबवता भांडवलदारांचे हित जोपासले आहे. मागील एका वर्षात भारतातील अब्जाधीशांची संख्या १०२ वरून १६६ झाली आहे. याच्या उलट गरिबाला जगण्यासाठी मूलभूत गरजाही परवडत नाहीत. नरेंद्र मोदींचे उद्योगपती मित्र गौतम अदानी यांची संपत्ती २०२२ या एका वर्षात तब्बल ४६ टक्क्याने वाढली आहे. देशातील गरीब आणि मध्यम वर्गावर श्रीमंतांपेक्षा जास्त कर लावण्यात आला आहे. देशातील एकूण जीएसटीच्या अंदाजे ६४% तळाच्या ५०% लोकांकडून आले आहेत तर फक्त ४% वरच्या १०% लोकांकडून आले आहेत असे अहवालात म्हटले आहे. मोदी सरकारच्या काळात गरिब अधिक गरिब होत चालला आहे. मोदी सरकारच देशातील ८० कोटी जनतेला रेशनवरील मोफत धान्य देत असल्याचे सांगत आहे, ही अभिमानाची बाब नसून दुर्दैव आहे. महागाई, बरोजगारीवर नियंत्रण मिळवण्यात मोदी सरकार अपयशी ठरले असून महागाईच्या दराशी तुलना करता लोकांचे उत्पन्न त्या प्रमाणात वाढलेले नाही. देशातील वाढती आर्थिक, सामाजिक विषमता हा चिंतेचा विषय असून केंद्रातील मोदी सरकार त्याकडे गांभिर्याने पहात नाही. देशात महागाई नाही असे निखालस खोटे विधान केंद्रीय अर्थमंत्रीच करतात यातूनच हे सरकार किती असंवेदनशील आहे हे दिसते. काँग्रेस पक्ष जनतेच्या हिताचे प्रश्न घेऊन सातत्याने संघर्ष करत आहे. राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेली कन्याकुमारी ते काश्मीर ही ३५०० किमी ची पदयात्रा सुद्धा देशातील महागाई, बेरोजगारी, शेतकरी, कष्टकरी लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठीच आहे. सामाजिक, आर्थिक विषमतेचा मुद्दाही या पदयात्रेतीत महत्वाचा मुद्दा आहे. भाजपची मातृसंस्था आसणा-या राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही तीन महिन्यापूर्वी देशातील वाढत्या सामाजिक, आर्थिक विषमतेवर चिंता व्यक्त केली होती पण मोदी सरकारने त्यातूनही काही बोध घेतल्याचे दिसत नाही, असेही लोंढे म्हणाले.



# पर्यावरण संवर्धन ही सामुदायिक जबाबदारी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** प्रदूषणाचा निषेध करण्यापलीकडे आपली उडी जात नाही. उपाय सुचविणे, आपापल्या परिसरात योग्य त्या यंत्रणा वापरणे, पाठपुरावा करणे यासाठी समाज जागा व कृतिशील हवा...

ग्लोबल वॉर्मिंग हे जागतिक संकट आहे पण त्याचे उत्तर मात्र सार्वत्रिक आहे, व्यक्तिगत आहे. आपण सर्वांनी जर आपापल्या समजाप्रमाणे पर्यावरणसहयोगी वागायचे ठरविले तरीही हळूहळू हे पर्यावरणावरचे संकट दूर होईल. हा केवळ आशावाद नाही कारण या संकटाची निर्मितीही आपण सर्वांनी मिळून केली आहे. आपल्या सर्वांच्या सवयी या संकटाला अधिक कठीण बनवित आहेत. आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच ह्या संकटातून आपल्याला मुक्ती मिळू शकेल. आपल्याला सवयी बदलण्याचा जीवापाड प्रयत्न करायला हवा!

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये जग अनैसर्गिक विकासाच्या दिशेने जसे जसे पुढे जात आहे तसाच पर्यावरणाचा र्हास देखील झपाट्याणे वाढत चालला आहे. वाढती वृक्षतोड, वाढते औद्योगिकीकरण आणि त्यामुळे वाढत चाललेले प्रदूषण, नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास, पर्यावरणाची हानी, जागतिक तापमानवाढ, $CO_2$ चे वाढते प्रमाण इत्यादी समस्यांचे वाढते प्रमाण बघता या गंभीर विषयांबाबत विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरण संवर्धनासाठी जाणीव व्हावी या उदात्त हेतूने शंकरराव भेलके महाविद्यालयात पर्यावरणविषयक भित्तीचित्रे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग दर्शविला. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे क्रमांक मिळविले प्रथम क्रमांक कु. स्वामिनी जायगुडे ( तृतीय वर्ष कला) द्वितीय क्रमांक कु. सिद्धी गोळे ( प्रथम वर्ष वाणिज्य) व तृतीय क्रमांक कु. राणी खुटवड ( प्रथम वर्ष वाणिज्य). या स्पर्धेचे आयोजन प्रा. सीमा कांबळे यांनी केले. तर मार्गदर्शन प्रा. जाधवर डी. एस. यांनी केले. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. सचिन घाडगे, प्रा.डॉ. जगदीश शेवते , प्रा. कोमल पोमण, प्रा. महेश कोळपे, प्रा. प्राजक्ता कापरे उपस्थित होते.

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी शाळेला दुहेरी मुकट

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मालीवाड्याच्या राष्ट्रमाता इंदिरा गांधी शाळेच्या विद्यार्थ्यांनी १४ वर्ष, १७ वर्ष व १९ वर्षे वयोगटात विजयी मिळवत जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि औरंगाबाद जिल्हा रब्बी संघटनेच्या वतीने विभागीय क्रीडा संकुल येथे नुकतेच जिल्हास्तरीय ग्रामीणच्या रग्बी स्पर्धे पार पडल्या. स्पर्धेत प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा भारती व औरंगाबाद ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष पंकज भारसाखळे, क्रीडा अधिकारी लता लोंढे, रब्बी संघटनेचे सचिव शाम अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेत एकूण 18 शाळेच्या संघाने विविध वयोगटात सहभाग नोंदविला तर सर्व विजय संघांना क्रीडा भारतीच्या वतीने चषक प्रदान करण्यात आले. **स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे आहे- १४ वर्षे वयोगट(मुली):** प्रथम- राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी स्कूल, माळीवाडा. **१४ वर्षे वयोगट (मुले):** प्रथम- राष्ट्रमाता इंदिरा गांधी स्कूल, माळीवाडा, द्वितीय- डिफेन्स करिअर अकॅडमी, करोडी. **१७ वर्ष वयोगट (मुले):** प्रथम- छत्रपती शिवाजी, माळीवाडा, द्वितीय- राष्ट्रमाता इंदिरा गांधी स्कूल, तृतीय-महात्मा फुले विद्यालय, माळीवाडा. **१७ वर्ष वयोगट (मुली):** प्रथम राष्ट्रमाता इंदिरा गांधी स्कूल, द्वितीय- स्वामी रामदास विद्यालय, गिरनार तांडा. **१९ वर्ष वयोगट (मुली):** प्रथम- राष्ट्रमाता इंदिरा गांधी स्कूल, माळीवाडा. द्वितीय- स्वामी रामदास विद्यालय, गिरनार तांडा. **१९ वर्ष वयोगट (मुले):** प्रथम-राष्ट्रमाता इंदिरा गांधी स्कूल, माळीवाडा, द्वितीय-डिफेन्स करिअर अकॅडमी, कारोडी, तृतीय-छत्रपती शिवाजी स्कूल, माळीवाडा. स्पर्धेत पंच म्हणून अजय सातपुते, योगेश जाधव, अर्जुन पवार, कृष्णा चव्हाण, अजिंक्य लोळगे, आदित्य सोनवणे, मनोज डोंगरे, अजिंक्य साठे, करण राठोड, चैतन्य कटारे यांनी काम पाहिले.



# युवा नेते धीरज पाटील गोजेगावकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** तालुक्यातील मुक्रमाबाद भागाचे उगवतं, युवा नेतृत्व युवानेते धिरज पाटील गोजेगावकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला आहे. गोजेगाव येथील महादेव मंदिर येथे पुजा व आरती करण्यात आली आहे. भाजपा तालुका उपाध्यक्ष नामदेव पाटील थडके व युवासेनेचे प्रकाश पाटील वसुरकर यांनी युवा नेतृत्व धिरज पाटील गोजेगावकर व आमदार डॉ तुषार राठोड यांना क्रेन ने हार घातला. तालुक्यातील मुक्रमाबाद विभागात क्रेन ने प्रथमच पुष्पहार घातला आहे.



युवा नेत्याला शुभेच्छा देण्यासाठी मुखेड- कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड यांनी वाढदिवस साजरा करुन भविष्य काळामध्ये या भागाचे राजकीय नेतृत्व करण्याची संधी त्यांना ईश्वर त्यांना देवो. अशी सदिच्छा व्यक्त करून भारतीय जनता पार्टी मध्ये काम करत असताना जेव्हा जेव्हा राजकीय क्षेत्रामध्ये संधी देण्याची गरज पडेल, तेव्हा माझ्या वतीने न्याय देऊन त्यांना या पक्षामध्ये अधिक काम करण्याची संधी मी देईन. त्यांच्या मित्र मंडळला व त्यांच्या कुटुंबीयांना अस्वथ करून शुभेच्छा देतो.

यावेळी भाजपचे संग्राम मळगे, हणमंत मामा वाडीकर, लक्ष्मन पाटील खैरकेकर, गणेश पाटील जाधव, बालाजी पाटील बनबरे, दत्तात्रय पोलीस पाटील, दिगंबर पोलीस पाटील, दिनेश आप्पा आवडके, हेमंत खंकरे, मिलींद लोहबंदे, संगमेश्वर देवकत्ते, कैलास येसगे, शिवशंकर पाटील कलबंरकर, बालाजी ढोसणे, बालाजी पाटील सांगवीकर, शिवसेनेचे मन्मथ खंकरे, अतुल सुन्नेवाड, व्यंकट गुरुजी वसुरकर, किशोर चौव्हाण, राजेश गज्जलवाड, कपिल पाटील बनबरे, रामदास पाटील माळेगावे, अनिल पाटील दापके, कमलाकर आगदे, नागेश गोपनर, विजयकुमार स्वामी, किरण पाटील, गुरुनाथ पाटील, वैभव पाटील राजुरकर व धिरज पाटील मित्र मंडळाचे अमोल पाटील गोजेगावकर, राजु पाटील गोजेगावकर, शांतेश्वर मळगे, नितीन पाटील, अजित पाटील, विठ्ठल पाटील, रमा चव्हाण, कोंडीबा गायकवाड, हणमंत भुरे, दिगाबंर पाटील, पत्रकार दत्ता पाटील माळेगावे, सुनिल गायकवाड, मानिक जमादार, गोविंद पांचाळ, संतोष सुर्यवंशी, अशोक गिरी, सुनिल देशमुख व पंचक्रोशीतील जनता,व गावातील जेष्ठ मंडळी व नागरिक उपस्थित होते.

# वाळूची अवैध वाहतूक करणारे ट्रॅक्टर ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**देवळा :** तालुक्यातील लोहोणेर-माळवाडी रस्त्यावर अवैधरित्या वाळू वाहतूक करणारे चार ट्रॅक्टर मंगळवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास देवळा पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईने परिसरातील वाळू तस्करी उघड होत आहे. सहायक पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. गिरणा नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून केल्या जातात. यासंदर्भात माहिती मिळाल्यानंतर लोहणेर-माळवाडी रस्त्यावर पोलिसांकडून सापळा रचण्यात आला. पहाटे दोन ते तीन वाजेच्या दरम्यान चार ट्रॅक्टर वाळूची अवैधरित्या वाहतूक करताना पकडण्यात आले. हे तीनही ट्रॅक्टर ताब्यात घेऊन पोलीस ठाण्याच्या आवारात जमा करण्यात आले.तपासणीत चालकाकडे वाहतुकीचा परवाना नसल्याचे आढळले. ट्रॅक्टर मालक आणि चालकाची माहिती घेतली गेली.

या कारवाईने वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत. संबंधित ट्रॅक्टर मालकांना सहा लाख रुपयांचा दंड होणार असल्याची माहिती शिरसाठ यांनी दिली.

# 'मायेची चादर' गरजू, गरिबांना मोफत वाटप कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विधी व न्याय विभाग धर्मदाय सह-आयुक्त कार्यालय, औरंगाबाद व सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 16 जानेवारी 2023 रोजी संत ज्ञानेश्वर नगर, सातारा परिसर बीड बायपास औरंगाबाद येथे 'मायेची चादर' गरजूंना मोफत वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष अंबादासराव रगडे, ज्येष्ठ समाजसेवक, प्रमुख पाहुणे म्हणून उत्कर्ष संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर हनवते, रामजी आव्हाड, रावसाहेब लहाने, गौतम साळवे, एकनाथ उमाप, सुभाष गवळी इत्यादी मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली गायकवाड यांनी केले. प्रस्ताविक सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामदास गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन शरद गवळी यांनी मानले. यावेळी छगाबाई हिवाळे, सविताबाई हिवाळे, सोजरबाई उमाप, अनिता, कमलबाई पाटोळे, ज्योतिबाई गायकवाड, अशाबाई पाटोळे, ज्योती कांबळे, लक्ष्मीबाई थोरात यांना मायेचे चादर देण्यात आले.



# नाशिकवर आज अंतिम निर्णय : अजित पवार

## दावोसनंतर सरकारने आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण करावे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेसने नाशिक पदवीधर मतदारसंघातील दोन्ही उमेदवारांवर कारवाई केल्याने आघाडीचा उमेदवार कोण याबाबत चर्चा निर्माण झाली आहे. दरम्यान अपक्ष महिला उमेदवार शुभांगी पाटील यांनी उध्दव ठाकरे आणि माझ्याशी संपर्क साधला आहे त्यामुळे यावर उद्या अंतिम निर्णय होईल अशी माहिती विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

काँग्रेसचे डॉ. सुधीर तांबे यांनी अधिकृत उमेदवारी जाहीर झालेली असताना अर्ज दाखल न केल्यामुळे नाशिकमध्ये पेच निर्माण झाला आहे. आघाडी म्हणून जागा वाटप करताना औरंगाबाद (विक्रम काळे) ही जागा राष्ट्रवादीकडे तर नाशिक काँग्रेसकडून डॉ. सुधीर तांबे यांना उमेदवारी देण्यात आली मात्र त्यांनी अर्ज भरला नाही. हा अर्ज न भरण्यामागे काय कारण आहे हे फक्त डॉ. सुधीर तांबेच सांगू शकतील असेही अजित पवार म्हणाले. तीन टर्म आमदार असल्याने या जागा वाटपावर चर्चा झाली नाही. महाविकास आघाडीतील नेते एकमेकांशी चर्चा करत होते. आमचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याशीही चर्चा झाली होती. आताही ते सतत फोनव्दारे संपर्कात आहेत. मात्र नाशिक येथे काहीतरी गडबड आहे याची कुणकुण लागली होती आणि याची कल्पना काँग्रेसच्या वरीष्ठांना दिली होती असेही अजित पवार यांनी सांगितले. या जागा वाटपावर भाजप बोलत आहे. भाजपला संधी मिळाली आहे म्हणून बोलत आहेत मात्र त्यांच्या बोलण्याला काही अर्थ नाही. आम्ही बसून योग्य तो मार्ग काढला होता मात्र अर्ज न भरल्याने प्रश्न निर्माण झाला आहे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. हा काँग्रेस अंतर्गत प्रश्न आहे त्यात महाविकास आघाडीला गोवण्यात काही अर्थ नाही. तिन्ही पक्षाच्या नेत्यांनी बसून निर्णय घेतला होता त्याला मी साक्षीदार आहे असे सांगतानाच त्यामुळे महाविकास आघाडीत समन्वय नव्हता हे मी मान्य करणार नाही असे अजित पवार यांनी ठणकावून सांगितले. दावोसला गेले आहेत तर जास्तीत जास्त निधी आणावा व आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण करावे कारण काही लाख कोटी रुपये गुंतवणूक असणारे प्रकल्प बाहेर जाऊ देणे आणि काही लाख तरुणांना रोजगारापासून वंचित ठेवले हे घडलेले हे त्रिवार सत्य असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट करतानाच ४५ हजार कोटींचा करार होणे आणि प्रत्यक्षात गुंतवणूक होणे हे पहावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या भल्यासाठी गुंतवणूक येणार असेल तर आम्हाला आनंद आहे आणि त्याचे स्वागतच करु असे स्पष्टच सांगितले. हिंदी राष्ट्रभाषेविषयी देशपातळीवर चर्चा झाली होती. आपण बोलत असताना जागतिक भाषा म्हणून इंग्रजीचा तर राष्ट्रीय भाषा म्हणून हिंदी आणि मातृभाषा म्हणून मराठी भाषेचा उल्लेख करतो. पण मराठी - इंग्रजीबद्दल दूमत असण्याचे कारण नाही. या दोन्ही भाषा मोठ्याप्रमाणावर बोलल्या जातात. मात्र राष्ट्रभाषेबद्दल तशाप्रकारे केंद्रसरकारने हिंदी राष्ट्रभाषा जाहीर केलेली नाही. केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यांची याबाबत वेगळी भूमिका आहे. परंतु महाराष्ट्राचा नागरीक या नात्याने विचारले तर हिंदी राष्ट्रभाषा करायला हरकत नाही तसा केंद्रसरकारने प्रयत्न करावा अशी मागणीही अजित पवार यांनी केली.

आदित्य ठाकरे यांनी मुंबई मनपातील रस्ता गैरप्रकारांबाबत ज्या बऱ्याच गोष्टी सांगितल्या त्यात शंभर टक्के तथ्य आहे. मुंबईवर प्रशासक आहे. प्रशासक व नगरविकास खात्याची वस्तुस्थिती काय आहे याचे महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. यावर आयुक्त आणि त्यांच्या टीमचे काय म्हणणे आहे हे राज्याला व मुंबईकरांना कळले पाहिजे अशी मागणी अजित पवार यांनी यावेळी केली.

## आंतरशालेय लेझीम स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा लाभलेला लेझीम या खेळाचे श्री गुरुजी पुरस्कार सोहळ्यानिमित्त



क्रीडा भारती तर्फे भव्य जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. जनकल्याण समितीतर्फे अखिल भारतीय स्तरावर दिला जाणारा श्री गुरुजी पुरस्कार सोहळा यावर्षी संभाजीनगर शहरांमध्ये संपन्न होणार असून त्या निमित्ताने या लेझीम स्पर्धेचे आयोजन सोमवार 23 जानेवारी रोजी सिडको एन-५ येथील धर्मवीर संभाजी विद्यालयत करण्यात आलेले आहे.

स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या संघास अनुक्रमे अकरा हजार, सात हजार व पाच हजाराचे रोख बक्षीसे व चषक प्रदान करण्यात येणार असून या स्पर्धेचे प्रवेशिका क्रीडा भारतीचे सहमंत्री विनायक राऊत यांच्याकडे 21 जानेवारी पर्यंत स्वीकारले जातील. जास्तीत जास्त संघांनी या लेझीम स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवावा असे आव्हान श्री गुरुजी पुरस्कार सोहळ्याच्या स्वागत समितीचे अध्यक्ष श्रीमती रेखा राठी, महाव्यवस्थापक केदार जोशी, क्रीडा भारतीचे अध्यक्ष पंकज भारसाखळे, मंत्री डॉ. संदीप जगताप यांनी केले.

## घर सोडलेल्या बाबांची संक्रांतीच्या दिवशी परिवाराशी भेट; केशवस्मृती प्रतिष्ठान समतोल प्रकल्पाची कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येथील रागाच्या भरात घर सोडलेल्या ६८ वर्षीय बाबांना केले संक्रांतीच्या दिवशी परिवाराच्या स्वाधीन. केशवस्मुर्ती प्रतिष्ठान समतोल प्रकल्पाची कामगिरी* दि १/१/२०२३ रोजी सुरत येथून निघालेल्या ६८ वर्षीय बाबांना घरातील सदस्य यांच्या कडून चांगली वागणूक मिळत नव्हती. घरात दोन मुल असून मोठा मुलगा दारू पिउन आई , वडिलांना शिवीगाळ करीत असे, तर दुसरा मुलगा पत्नीला घेऊन वेगळा राहत आहे.

या रागाने ६८ वर्षीय बाबा ( रमेश दगा माळी ) हे बाबा ३/१/२०२३ ला जळगाव रेल्वे स्टेशनवर फिरत असतांना केशव स्मुर्ती प्रतिष्ठान समतोल प्रकल्पाचे कर्मचारी प्रदिप पाटील , व विश्वजित सपकाळे यांना दिसले , त्यांनी लगेच बाबांना विचारपूस करणे सुरू केले असता समजले की बाबा रागाच्या भरात घरून निघुन आलेले आहेत.

बाबा घरी जाण्यास तयार नव्हते. बाबांची परिस्थिती अशी होती की, ते भीक मागून ही खाऊ शकत नव्हते. सोबत एक हजार रुपये आणलेले होते. रात्री पोलीस मारतील यामुळे बाबा रेल्वे स्टेशनच्या परिसरातील लॉज मध्ये पैसे देऊन राहिले व दिवसाला स्टेशनवर आले , पैसे सर्व खर्च झालेले होते , खिश्यात आता पैसे नाहीत आणि घरी व कोणत्याही नातेवाईक यांच्या कडे बाबांना जायायच नव्हते , तेव्हा समतोल प्रकल्पाचे प्रदिप



पाटील, व विश्वजित सपकाळे यांनी बाबांना बेघर निवारा केंद्र जळगाव या ठिकाणी जाण्यास तयार केले, व शेवटी बाबा तयार झाले व आम्हाला देव माणूसच समजू लागले कारण बाबांकडे आत्महत्या शिवाय काही ही पर्याय नव्हता आणि त्यावेळेतच आम्ही त्यांना भेटलो , बाबांना बेघर निवारा केंद्रात दाखल करून बाबांचा परिवाराशी संपर्क करून परिवाराचे समुपदेशन करून आज दि १४/१/२०२३ मकरसंक्रांतीच्या सणाच्या दिवशी बाबांना घेण्यासाठी आलेले त्यांचे लहान सुपुत्र यांच्या ताब्यात बाबांना स्वाधीन करण्यात आले. त्यांना तिळगुळ देऊन परिवाराचा गोडवा निर्माण करून परत दिशाहीन झालेल्या बाबांना तुटलेला परिवार परत मिळाल्याने बाबांचा आनंद गगनात माव्हत नव्हता, मुलाने व बाबाने आनंदाची मिठी मारली, आनंदाचे अश्रू बाबांच्या डोळ्यातून वाहत होते. बाबांना परिवाराशी जोडण्याचे अनमोल कार्य करण्यात हातभार लागला.

## सखख्या बहिणींचे मृतदेह आढळल्याचे खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिखलठाणा येथील ३ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या दोन सख्ख्या बहिणीचे मृतदेह विहिरीत तरंगताना आज (दि. १६) आढळून आले. स्वाती दत्तु चव्हाण (वय१९) आणि शितल दत्तु चव्हाण (वय १५) असे मृत दोन सख्ख्या बहिणीची नावे आहेत. या दोघींचा त्यांच्याच शेतातील जुन्या पडक्या विहिरीत पडून मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, शनिवारी (दि.१४) दुपारी दोन वाजेच्या सुमारास विहिरीच्या कडेला असलेले गिन्नी गवत जनावरांना कापून आणतो, असे सांगून स्वाती आणि शितल शेतात गेल्या होत्या. सायंकाळ झाली तरी मुली घरी का आल्या नाही, म्हणून कुटुंबीयांनी शेतात जाऊन शोधाशोध केली.

मात्र, मुली कुठेच आढळून आल्या नाहीत. त्यामुळे भयभीत झालेले वडील दत्तु बाबुराव चव्हाण यांनी मुली बेपत्ता झाल्याची फिर्याद कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली.

सोमवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास नातेवाईक मुलीचा शोध घेत असताना गिन्नी गवताच्या शेजारच्या गट क्रमांक १७० शेतातील जुन्या पडक्या विहिरीत स्वाती आणि शितल या दोन्ही सख्ख्या बहिणीचे मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळले. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव, सहाय्यक पोलीस निरीक्षक राम बारहाते यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी चिखलठाणा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवले. वैद्यकीय अधिकारी जयदिप झगरे, वैद्यकीय अधिकारी समरीन खान यांनी सायंकाळी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिले.

या घटनेमुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राम बारहाते करत आहेत.

## उपशिक्षणाधिकारी निकम यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** येथील महात्मा ज्योतिबा फुले कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी स्वप्निल निकम याने उपशिक्षणाधिकारी होण्याचा बहुमान मिळविला. जालना जिल्हा परिषदेत ते उपशिक्षणाधिकारी म्हणून रुजू झाले. हे औचित्य साधून महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य एन आर नवले यांच्या हस्ते त्यांचा क. रा. नवले लिखित 'वज्रमुठ' आणि प्रा डॉ संजय गायकवाड लिखित 'निवडक प्रबोधनकार' ग्रंथ देऊन वडील निवृत्त प्राचार्य के. जी. निकम यांच्यासह त्यांचा सत्कार करण्यात आला. या अगोदर स्वप्निलची विविध स्पर्धा परीक्षांच्या



माध्यमातून सिंचन विभागात कालवा निरीक्षक, आयकर विभागात निरीक्षक आणि मुंबई मंत्रालय येथे सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून निवड झालेली होती.

त्याचबरोबर आदिवासी विभाग, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय आणि आर्मी पब्लिक स्कूलमध्ये त्याची शिक्षक म्हणूनही निवड झालेली होती हे विशेष!सत्कार प्रसंगी संस्थेचे संचालक सुनील भाऊ मोकासे, विभाग प्रमुख प्रा विजय वाघ, प्रा डॉ संजय गायकवाड आणि गणेश मोकासे पेंटर यांची विशेष उपस्थिती होती. या शाळेने गावाने आणि परिसराने माझ्या व्यक्तिमत्व घडविण्यामध्ये मोलाची कामगिरी बजावलेली आहे. त्यामुळे या मातीचे ऋण फेडण्याचा सदैव प्रयत्न करीन, असे सत्कारास उत्तर देताना स्वप्निल निकम यांनी सांगितले.

## तीळगूळ घ्या, गोडगोड बोला, फक्त सोशल मीडियावरच

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** "आठवण सूर्याची, साठवण स्नेहाची, गुळाचा गोडवा, स्नेह वाढवा', "एक तीळ रुसला, फुगला; रडत गुळाच्या पाकात पडला, खटकन हसला, हातावर येताच बोलू लागला, तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' अशा हजारो गुळचट शुभेच्छांनी रविवार दि.१५/१/२३ प्रत्येकाच्या मोबाईलचा चॅटबॉक्स भरून पावला आहे.केवळ शब्दांच्या स्वादिष्ट शुभेच्छा सोशल मीडियाद्वारे दिल्या जात असताना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देण्याची परंपरा संपुष्टात आल्याचा फील या मकर संक्रांतीला अनेकांना आला. नवीन वर्षाची सुरवात गोडीगुलाबीने व्हावी, यासाठी मकर संक्रांतीचे औचित्य साधले जात असावे. जुनी भांडणे, मतभेद, गैरसमज बाजूला सारून नव्या वर्षात "तिळगूळ घ्या अन् गोड गोड बोला' असा संदेश संक्रांतीला दिला जातो. या निमित्ताने परस्परांच्या घरातील वेगवेगळ्या चवीचा तिळगूळही खायला मिळतो.मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे मोबाईलवरच सुंदर दिसणाऱ्या तिळगुळाच्या आकर्षक छायाचित्रांची कोरडीच चव चाखावी लागत आहे. सणावाराला सकाळपासूनच प्रत्येकाच्या मोबाईलमधील फेसबुक, व्हॉट्सऍपचा चॅटबॉक्स अशा शुभेच्छांनी भरून जातो आहे. व्हॉट्सऍपवर मकर संक्रांतीनिमित्त आकर्षक इमोजी, स्टिकर्स आणि इमेजेस तयार करून परस्परांना पाठविल्या. त्यामुळे प्रत्यक्षात भेटून तिळगूळ देण्याची परंपरा संपत असल्याचे चित्र सर्वत्र बघायला मिळाले.



**तरुण–तरुणीच काय म्हणतात...**

शाळेत असताना सर्व मित्र–मैत्रिणी घरचा तिळगूळ आणत असत. आता मात्र शाळेतले जुने मित्रदेखील व्हॉट्सऍपवर फोटो पाठवून गोडगोड बोलण्याचा आग्रह करीत आहेत. तसेच कोरोनामुळे शाळाही बंद आहेत.

**कु. श्रावणी पुजारी, सावळदबारा**

महागाई वाढल्याने प्रत्येकाला तिळगूळ देणं शक्य नाही. यामुळे मोबाईलवरून मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिलेल्या सर्वत्र बघायला मिळाल्या; परंतु आम्ही प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देण्यास प्राधान्य दिले.

**सौ. करुणा गावडे, सावळदबारा**



# शासन दरबारी लाखोंचा टॅक्स तरीही असुविधांचा बाजार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात निधी तर मिळतो; मात्र तो निधी खरोखरच स्वच्छतेच्या कामावर किती खर्च होतो हे शहरातील कमलाबाई हायस्कूल जवळ पहायला मिळते अनेक महिन्यांपासून पालिका आयुक्त व उपायुक्त हे पाहणी करून गेले असता या गोष्टीचा ठेकेदाराच्या संमतीने ठराव देखील मंजूर केला गेला असे सांगितले जाते परंतु अनेक दिवसापासून हीच दुरावस्था व नागरिकांना होणारा त्रास यावर कुठलाही बदल झाला नाही अस्वच्छतेवरून स्पष्ट होते. या घाणीने तुडूंब भरलेल्या असून ते घाण पाणी रस्त्यावर वाहत आहे. तर काही ठिकाणी कचरा हा अस्ताव्यस्त पसरून रोगाला आमंत्रण देण्याचं काम करीत आहे. एकीकडे व्यापारी लाखोंचा टॅक्स भरतात तर दुसरीकडे त्यांच्याच परिसरात अशी दुरवस्था पाहण्यास मिळते. शहर स्वच्छतेवर भर असल्याची ओरड स्थानिक प्रशासनाकडून केली जात असली तरी शहरात अनेक ठिकाणी असलेली घाण व कचरा हे स्वच्छतेबाबत किती जागृत आहे हे दाखवून देते. देशपातळीपासून ते गावपातळीपर्यंत स्वच्छतेकरिता प्रत्येक गावाकरिता लाखो, करोडो रुपयांचा निधी वितरीत केल्या जातो. अन तो निधी नागरिकांच्या सवच्छतेच्या दृष्टीने केला जातो. मात्र, त्या निधीची विल्हेवाट स्वच्छतेच्याच दृष्टीने करणे हे काम स्थानिक प्रशासनाचे असते व त्या निधीतून शहर स्वच्छतेवर भर देणे हे कामही तेवढेच महत्त्वाचे असते. सध्या धुळे शहरात फक्त राजकारणाचा बाजार मांडला असून अशामुळे नागरिकांचा सोयी सुविधांचा प्रश्न मिटेल का असा प्रश्न धुळेकर नागरिकांच्या मनात उपस्थित होत आहेत.

# शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग खराब झाल्यामुळे टोल वसुली करता येणार नाही

## मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग खराब झाल्यामुळे शक्तीने टोल वसुली करू नये म्हणून दि,१८/१/२०२३. रोजी श्रीमान राज साहेब ठाकरे मराठवाड्याच्या दौऱ्यावर परळी येथे येणार आहेत, या राष्ट्रीय महामार्गाच्या गंभीर विषयावर मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाड्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या सोबत चर्चा करणार आहेत असे हि श्री सोळंके यांनी सांगितले, तसेच जिल्हाधिकारी जालना यांच्यामार्फत निवेदन देऊन निवेदनात पुढे म्हटले आहे. नरेंद्रजी मोदी प्रधानमंत्री भारत सरकार यांचे काम अप्रतिम आहे. परंतु त्यांच्या आसऱ्याखाली काही लोक पैसा कमावण्याच्या उद्देशाने देशाचे हित ना लक्षात घेता पैसा कमावण्याचा एकमेव दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून बोगस काम करीत आहेत, म्हणून खामगाव ते पंढरपूर महाराष्ट्र राज्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ या रस्त्यावरून दळणवळण करणाऱ्या लोकांकडून टोल वसुली करता येणार नाही, काम चोराला धाम चोर भेटतो, रस्त्याचे काम बरोबर झाले नाही म्हणून टोल वसुली करता येणार नाही, मा.नितीनजी गडकरी यांच्याकडे या राष्ट्रीय महामार्गाचे काम बरोबर झाले नाही म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मा.जिल्हाधिकारी जालना यांचा सोबत चर्चा करून त्यांच्यामार्फत निवेदन देऊन दि.११/१/२०२३ रोजी तक्रार करण्यात आलेली आहे, तक्रारीत मागणी केलेली आहे या राष्ट्रीय महामार्गाचे काम संबंधित गुत्तेदारांकडून नव्याने काम करून घेतले पाहिजे मा.नितीनजी गडकरी रस्ते विकास व वाहतूक केंद्रीय मंत्री झाल्यापासून अनेक मोठमोठे रस्ते झाले जवळपास ९८ टक्के रस्त्याचे कामे उत्तम दर्जाचे झाले आहेत. परंतु शेगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ या महामार्गाचे काम ५० टक्के बोगस झाल्यामुळे राष्ट्रीय महामार्गाचे काम दंडात्मक कारवाई करून नव्याने करून घेतले पाहिजे तरच येणाऱ्या पिढ्याला खड्ड्यात पडून मरायची वेळ येणार नाही. शेगाव ते पंढरपूर या रस्त्यावर टोल वसुली करू नये ही जनहितार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने घेतलेली वास्तव भूमिका आहे कारण छत्रपती शिवाजी महाराज यांनी या महाराष्ट्राला शिकवलेले आहे. देशासह महाराष्ट्रत रयतेचे राज्य असले पाहिजे, म्हणून राष्ट्रीय महामार्गाचे काम खराब झाल्यामुळे व या राष्ट्रीय महामार्गाचे काम कागदोपत्री व्यवस्थित करणाऱ्या लोकांवर राज्य सरकारने व केंद्र सरकारने खटले दाखल करून कारवाई केली पाहिजे कारवाई झाली तर अशा प्रकारचे बोगस कामे होण्यास आळा बसेल. म्हणून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ या महामार्गावर टोल वसुली करू नये म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विनम्र विनंती आहे या राष्ट्रीय महामार्ग केंद्र व राज्य सरकार टोल रद्द करून कारवाई करील हे अपेक्षा आहे.. उत्तर भारत महाराष्ट्र राज्यातून दक्षिण भारताला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ या राष्ट्रीय महामार्गाचे काम बरोबर न झाल्यामुळे या राष्ट्रीय महामार्गावर टोल वसुली करण्याबाबत केंद्र व राज्य सरकारने निर्णय घेऊन टोल वसुली करू नये याबाबत कारवाई करण्यात यावी असे मागे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ संभाजीराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांना माननीय जिल्हाधिकारी जालना यांच्यामार्फत निवेदन देऊन तक्रार करण्यात आली. तक्रारी शेवटी असा इशाराही मनसेच्या वतीने या राष्ट्रीय महामार्गाचे काम बोगस झाल्यामुळे जनहितार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला ही भूमिका घ्यावा लागत आहे दिला आहे या राष्ट्रीय महामार्गावर शक्तीने टोल वसुली केली तर विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्याच्या हद्दीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मार्गावरील प्रत्येक शहर गाव तांडे वस्ती वाड्या या भागातील जनता रस्त्यावर येऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे, तसेच मा.नरेंद्रजी मोदी प्रधानमंत्री भारत सरकार, मा.अमितजी शहा केंद्रीय गृहमंत्री भारत सरकार मा.नितीनजी गडकरी रस्ते व वाहतूक केंद्रीय मंत्री भारत सरकार यांना माहितीस्तव तक्रार सादर करण्यात आली असेही पत्रात नमूद केलेले आहे.

# पैठण येथे "विरंगुळा" संचलित स्व. यशवंतराव चव्हाण स्मृती व्याख्यानमाला

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** शहराच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जाणीवा जोपासणारी "विरंगुळा"संचलित स्व. यशवंतराव चव्हाण स्मृती व्याख्यानमाला यंदा २५व्या वर्षात पदार्पण करत आहे शनिवार दि. २१ जानेवारी ते सोमवार दि.२३ जानेवारी दरम्यान आयोजित या तीन दिवसीय व्याख्यानमालेत ॲड. असीम सरोदे, राजेंद्र गहाळ आणि दिशा पिंकी शेख यांची व्याख्याने होणार आहेत.

पैठण शहरातील छत्रपती संभाजी महाराज अभ्यासिकेच्या प्रांगणात दररोज सायंकाळी ६:३० वा. व्याख्याने होतील. शनिवार दिनांक२१ जानेवारी २३ रोजी संविधानिक नैतिकता जिवंत आहे काय? या विषयावर ॲड. असीम सरोदे हे विचार मांडणार आहेत. सरोदे हे संविधान, मानवीहक्क,पर्यावरण आणि आतंरराष्ट्रीय कायदा या विषयाचे अभ्यासक आहेत. व्याख्यानमालेचे उदघाटन शिवाजी नागरी सहकारी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे यांच्या हस्ते, शालिवाहन नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन किशोर चौहान यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून चेतक नागरो सहकारी पतसंस्थेचे चेअरमन कल्याण बरकसे आणि गुरुकुल इंग्लिश स्कुलच्या संचालक अश्विनीताई लखमले या उपस्थित राहणार आहेत. दुसऱ्या पुष्पात रविवार दिनांक २२ जानेवारी २३ रोजी परभणी येथील ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ हे "मायबाप - एक अनमोल खजिना" या विषयावर संवाद साधणार आहेत.श्री गहाळ यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. विविध साहित्य संमेलने त्यांनी दमदार कथाकार म्हणून गाजवली आहेत. अध्यक्षस्थानी सचिन घायाळ शुगर लिमिटेडचे चेअरमन सचिन घायाळ हे असतील,तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा रेखाताई कुलकर्णी आणि रेणुकादेवी







शरद सहकारी साखर कारखान्याचे संचालक सोमनाथ परदेशी हे उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पात सोमवार दिनांक २३ जानेवारी२०२३ रोजी संगमनेर येथील कवियत्री दिशा पिंकी शेख या पारलिंगी कार्यकर्त्या "तृतीयपंथीयांचे जग"या विषयावर आपले अनुभव विश्व प्रकट करणार आहेत. सीमा पिंकी शेख या विद्रोही कवयित्री आहेत. पारलिंगीसाठी स्वयंसेवी संस्था चालवितात. तसेच राजकीय पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्या आहेत. पैठण शहर व परिसरातील नागरिकांनी या तीन दिवसीय ज्ञानयज्ञास कुटुंबियांसह उपस्थिती दर्शवावी, असे आवाहन व्याख्यानमालेच्या वतीने विरंगूळाचे अध्यक्ष देवेश इनामदार,उपाध्यक्ष प्राचार्य संतोष तांबे, सचिव प्रा. संतोष गव्हाणे, कार्यवाह अनिल प्र. देशमुख यांच्यासह सुनील चितळे, विष्णू ससाणे, बजरंग काळे आदींनी केले.

> १९९८ मध्ये प्रारंभ झालेली पैठणची ही व्याख्यांनमाला राज्यातील एक प्रतिष्ठित व्याख्यानमाला आहे . पक्षीय आणि सामाजिक अभिनिवेश बाजूला ठेवून सतत २५ वर्षे अव्याहत सूरु असलेल्या या उपक्रमाचे पैठणवासीयांना कौतुक आहे . संस्थात्मक सहकार्यातून सुरु असलेल्या या व्यासपीठावर राज्य व देशपातळीवरील अनेक व्यासंगी व्याख्यात्यानी विचार मांडले आहेत .हा उपक्रम शहराचे सांस्कृतिक वैभव असल्याची भावना आहे .

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# युवा शक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा : रमेश बियाणी

## 'दयानंद वाणिज्य'च्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे. नियमित कार्यक्रमांद्वारे महापुरुषांचे विचार हे जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमातून घेऊन श्रमदान, युवा सप्ताह, कार्यशाळा, शिबिर, सरकारच्या विविध कार्यक्रमांत सहभागी होतात. राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थी घडण्याचे केंद्र आहे. हा युवक राष्ट्र विकासात मोलाची भूमिका बजावेल, असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी यांनी केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर 16 जानेवारी 2023 पासून लातूर तालुक्यातील सामनगाव येथे सुरू झाले. या शिबीराचे उद्घाटन श्री.बियाणी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष संजय बोरा, नायब तहसीलदार एस.एस. उगले, सरपंच सौ.प्रीती बुलबुले, उपसरपंच सौ.स्वाती बुलबुले, ग्रामसेवक शिवप्रसाद नरवणे, तलाठी सौ. स्मिता आळंगे, मंडळ अधिकारी चव्हाण, पर्यवेक्षिका डॉ.अंजली बुरांडे-कोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, डॉ.गणेश लहाने, प्रा.शशिकांत स्वामी, प्रा.सुभाष मोरे आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.विशाल वर्मा यांनी केले. यावेळी बोलताना रमेश बियाणी म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, उद्दिष्टे, ब्रीदवाक्य व बोधचिन्ह हे या उपक्रमाचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करतात. स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्यशिक्षण हे सर्व स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा, तसेच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे, असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना श्री.संजय बोरा म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध होते. हे व्यासपीठ म्हणजे संस्काराचे, सामाजिक जाणिवेचे धडे देणारे व्यासपीठ आहे. अध्यक्षीय समारोप डॉ.राजाराम पवार यांनी केला. यावेळी सरपंच प्रीती बुलबुले आणि नायब तहसीलदार उगले यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो सह-कार्यक्रमाधिकारी प्रा.योगेश शर्मा आणि प्रा.अक्षय पवार यांनी तर आभार प्रा.सुवर्णा कारंजे यांनी मानले. पाहुण्यांचा सत्कार हार-तुरे गुच्छ न देता वृक्ष रोप भेट देऊन अनोख्या पद्धतीने करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. दीपक वेदे, सह-कार्यक्रमाधिकारी, प्रा.आमीर शेख, प्रा.अरुणा चौधरी, प्रा.श्रावण बनसोडे, प्रा.लता जाधव, प्रा.कल्पना टप्पेकर, ईश्वर बुलबुले, बालाजी बुलबुले, शिवानंद बुलबुले आदींनी परिश्रम घेतले.




**महात्म्यांचा आदर्श चित्रात नको, मनात व्हावा :प्रा .डॉ . साईनाथ उमाटे**

आजचा युवक हा सोशल मीडियामुळे भरकटत चालला आहे . युवकांनी केवळ महापुरुष यांच्या जयंती साजरी न करता त्यांचे विचार आत्मसात करण्याची खऱ्या अर्थाने आज गरज आहे . महात्मे केवळ चित्रात नकोत तर मनात हवेत, असे मत राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख प्रा .डॉ .साईनाथ उमाटे यांनी बोलताना व्यक्त केले . उद्घाटन नंतर दुपार सत्रात डॉ .उमाटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . यावेळी मंचावर ग्रंथपाल प्रा .विठ्ठल जाधव, ईश्वर बुलबुले यांच्यासह रासेयो समितीचे सर्वच पदाधिकारी उपस्थित होते . यावेळी डॉ .साईनाथ उमाटे यांनी विद्यार्थ्यांना शिस्त बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले .

## कुरणपूर शाळेत रंगला 'पतंग महोत्सव 2023'

आधुनिक केसरी न्यूज




**श्रीरामपूर :** आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुरणपूर केंद्रशाळा उक्कलगाव तालुका श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर याशाळेत मकरसंक्रांतिपर्वानिमित्ताने विद्यार्थ्यांना आनंद मिळावा आणि पतंग उडवण्याचे सुयोग्य कौशल्य प्राप्त व्हावे या हेतूने शाळास्तरावर पतंग महोत्सव 2023 चे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कोणत्या प्रकारचा मांजा वापरावा,धागा कसा बांधावा,शेपटी कशी जोडावी याबरोबरच मुलांना मांजा बांधणे, पतंग उडवणे, आसरी गुंडाळणे आणि ढील देणे ही कौशल्य शिकविण्यात आली. शनिवारी काही मुले शाळेतील वर्गशिक्षक रज्जाक शेख यांना म्हणाली की सर आम्हाला सोमवारी सुट्टी द्या, आम्हांला घरीच पतंग उडवायची आहेत. यावर शिक्षक रज्जाक शेख विद्यार्थ्यांना म्हणाले तुम्ही सोमवारी शाळेत या, आपण इथेच सर्व खूप धमाल करू. दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मुले सोमवारी शाळेत आल्यावर सरांनी गावातील दुकानातून काही पतंग विकत आणले, काही विद्यार्थ्यांच्या घरी अगोदरच खरेदी केलेले पतंग शाळेत मागविण्यात आले अन त्या पतंगाला दोरे लावून सुरू झाली धमाल. शाळेत असलेल्या म्युझिक सिस्टमवर स्वतःचा मोबाईल लावून सोबत "उडी उडी जाये /ढील दे दे रे दे देरे भैया यासारखी पतंग विषेश गीते वाजवण्यात आली. या गीतावर विद्यार्थ्यांनी मनसोक्त नृत्याचा आनंद घेतला. काहींची पतंग झाडात अडकू लागली, काही तुटली, काही फाटली पण मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद बहरत गेला.

पतंग उडवताना डोळ्यांची व गळ्याची काळजी कशी घ्यावी याची वेळोवेळी काळजी घेतली गेली. साधारण एक तासांच्या अंतरानंतर मुले थोडीशी थकली. कार्यक्रमात तिळगूळ वाटपाचा उपक्रम घेण्यात आला. मुलांच्या ओठावर तिळगुळाच्या गोडव्याने शाळेतील पतंग महोत्सवाला चार चांद लागले.

## भोकरमधील अवैध देशी दारूच्या घरपोच सेवेला कुणाचे अभय

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** शहरातील परवानाधारक देशी दारू विक्रीचे दुकानदार अवैधरित्या देशी दारूची विक्री करून चांगभलं करीत आहेत.परीसरातील गोरगरिबाचे संसार उध्वस्त होत असून राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक याकडे "अर्थपूर्ण" दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क अधिकारी उपविभाग बिलोली यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील परवानाधारक देशी दारू विक्रेत्यांना ज्या ठिकाणी दुकान आहे त्याच ठिकाणी देशी दारू विकण्याची परवानगी आहे. येथील राज्य उत्पादन शुल्क निरीक्षकांच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे तालुक्यातील ६० गावामध्ये दुचाकीवरून दारूचे बॉक्स घरपोच दिले जातात. अनेकाचे संसार उघड्यावर आले आहेत. व्यसनाच्या आहारी गेल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शांतता भंग होत असून वादावादीचे प्रमाण वाढत आहे.

परवानाधारक दुकानदार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियमांची पायमल्ली करीत आहेत.संबधीत विभागाने मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही. मुळ कींमतीपेक्षा अधिक दराने विक्री केली जात आहे. महापुरुषांची जयंती व शासकीय सुट्टी असलेल्या दिवशी सर्रास विक्री केली जाते, उत्पादन शुल्क निरीक्षक हे ठरलेल्या दिवशी येऊन कार्यवाही न करताच परत जातात.शहरातील देशी दारू विक्रेत्यांच्या कारभाराची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अन्यथा जनहित भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मराठवाडा प्रमुख मिलिंद गायकवाड यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



## शेकापूर येथील महात्मा फुले विद्यालयात पर्यवेक्षकपदी व्यंकट पुरमवार यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** शेकापूर येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे नवनिर्वाचित पर्यवेक्षक व्यंकटराव ईरन्ना पुरमवार सर यांची पर्यवेक्षक पदासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व जिल्हा परीषद सदस्य मा.संभाजीराव पा.केंद्रे व संस्थेचे सचिव व शेकापूर नगरीचे मा.सरपंच शिवाजीराव पा.केंद्रे, प्राचार्य मोतिभाऊ केंद्रे यांच्या आदेशावरून व्यंकटराव ईरन्ना पुरमवार सर यांची पर्यवेक्षक पदी नियुक्ती करण्यात आल्याबदल शाल व पुष्पहार घालुन त्यांचा सस्त्कार करण्यात आला.व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्कृतीक विभाग प्रमुख प्रा. अरूण केदार, मोहीत केंद्रे , सुर्यकांत श्रीमंगले, अमित लोंड, प्रा.देविदास जायभाये, प्रा.सौ. स्वाती रत्नगोले, प्रा. सुर्यकांत गुट्टे, चंद्रकांत पडलवार, प्रा. गिरीश नागरगोजे, साहेबराव काळे, प्रा. गोविंदराव आडे, प्रा.मोतिराम नागरगोजे, किशन ठोंबरे, प्रा. भारतलाल सुर्यवंशी, शिवाजीराव मेंडके, प्रा.विजय राठोड, प्रा. हाणमंत भालेराव, पत्रकार एस.पी. केंद्रे, मच्छींद्र नाईक, संभु वाघमारे, कृष्णा केंद्रे, बालाजी केंद्रे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश केंद्रे ,माधव कदम, मधुकर नागरगोजे, प्रकाश मुंडे, परमेश्वर निलेवाड आदींनी पर्यवेक्षक व्यंकट ईरन्ना पुरमवार यांना पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर घर संसार
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद